# बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक ४५ | बुधवार,दि.१२ ऑक्टोंबर २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# ठाकरे गटाला मशाल ! आयोगाकडून "शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे" नावास मान्यता

नवी दिल्ली : शिवसेना पक्षनाव आणि चिन्ह गोठविल्याच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने सोमवारी उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे गटासाठी नव्या नावांचे वाटप केले. त्यानुसार उद्धव ठाकरे गटाला "शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)' हे नाव मिळाले तर, शिंदे गटाच्या "बाळासाहेबांची शिवसेना' या पर्यायी नावाला मान्यता देण्यात आली. ठाकरे गटाला "धगधगती मशाल' हे चिन्ह देण्यात आले आहे.

ठाकरे गटाच्या वतीने "शिवसेना बाळासाहेब ठाकरे', "शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे' आणि "शिवसेना बाळासाहेब प्रबोधनकार ठाकरे' असे पक्षनावांचे तीन पर्याय आयोगापुढे सादर करण्यात आले होते. मात्र, "शिवसेना बाळासाहेब ठाकरे' हा पक्षनावाचा पर्याय शिंदे गटानेही दिला होता. दोन्ही गटांकडून एकाच नावाचा आग्रह धरला गेल्याने हे पक्षनाव कोणत्याही गटाला न देण्याचा निर्णय आयोगाने घेतला आणि ठाकरे गटाच्या दुसऱ्या पर्यायाला मान्यता देण्यात आली. त्यामुळे ठाकरे गट आता "शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)' या नावाने ओळखला जाईल.

ठाकरे गटाने "त्रिशूळ' "उगवता सूर्य' आणि "धगधगती मशाल' हे चिन्हांचे तीन पर्याय दिले होते. मात्र, हे तीनही पर्याय खुल्या यादीतील नव्हते. "त्रिशूळ' या चिन्हाला धार्मिक संदर्भ असून, शिंदे गटानेही याच चिन्हावर दावा केला होता. त्यामुळे हे चिन्ह दोन्हीही गटांना नाकारण्यात आले. "उगवता सूर्य' हे "द्रमूक' पक्षाचे चिन्ह असल्याने आणि या चिन्हावरही शिंदे गटाने हक्क सांगितल्याने हे चिन्हही रद्द झाले. "धगधगती मशाल' हे चिन्ह खुल्या यादीतील नसले तरी, आता ते खुले करण्यात आले आहे. हे चिन्ह २००४ मध्ये "समता पक्षा'ला देण्यात आले होते. अंधेरी पूर्व पोटनिवडणुकीसाठी "धगधगती मशाल' हे निवडणूक चिन्ह ठाकरे गटाला वापरता येईल. शिंदे गटाने "त्रिशूळ', "उगवता सूर्य' तसेच, "गदा' या चिन्हांचा पर्याय दिला होता. मात्र, "गदा' या चिन्हालाही धार्मिक संदर्भ असल्याने आयोगाने हे चिन्ह नाकारले. धार्मिक संदर्भ असलेली चिन्हे राजकीय पक्षांना निवडणूक चिन्हे म्हणून न देण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने सोमवारी, दुपारी एक वाजेपर्यंत पक्ष व चिन्हांचे तीन पर्याय सादर करण्यास सांगितले होते. मात्र, दोन्ही गटांकडून सादर झालेल्या नाव आणि चिन्हांमध्ये साधर्म्य असल्याचेही उघड झाले. त्यामुळे आयोगाकडून कोणता निर्णय घेतला जाईल, याकडे लक्ष लागले होते. अंधेरी-पूर्व विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक चिन्हाबाबत तातडीने निर्णय घेण्याची मागणी शिंदे गटाने केली होती. त्यावर, शनिवारी रात्री उशिरा केंद्रीय निवडणूक आयोगाने "शिवसेना'हे पक्षाचे मूळ नाव व "धनुष्यबाण'हे निवडणूक चिन्हही गोठवण्याचा हंगामी निर्णय घेतला.

ठाकरे गटाच्या वतीने पर्यायी पक्षनावे व चिन्हे जाहीर केली होती. मात्र, शिंदे गटाने केंद्रीय निवडणूक आयोगाला कोणते पर्याय सुचवले गेले, याबाबत सोमवारी दिवसभर या गटाच्या वतीने अधिकृतपणे भाष्य करण्यात आलेले नव्हते. मात्र, शिंदे गटाने सुचवलेल्या पक्षांच्या नावाचे व चिन्हांचे पर्याय ठाकरे गटाच्या पर्यायांप्रमाणेच असल्याचे सांगितले जात होते. शिंदे गटाने पक्षनावांसाठी "शिवसेना बाळासाहेब ठाकरे', "बाळासाहेबांची शिवसेना' आणि "शिवसेना बाळासाहेबांची' असे पक्षनावांचे तीन पर्याय आयोगाला सादर केल्याचे सांगण्यात येते. "आम्ही पक्षनाव तसेच चिन्हांचे पर्याय सादर केल्यानंतर लगेच ही बाब सार्वत्रिक केली जात असून शह-काटशहचा खेळ केला जात आहे' असा आरोप ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई यांनी केला.

## "मशाल' चिन्ह अन भुजबळांचा विजय

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला मिळालेल्या मशाल या चिन्हावर आधी १९८५ मध्ये शिवसेनेचे छगन भुजबळ हे एकमेव आमदार निवडून आले होते. तेव्हा शिवसेना हा नोंदणीकृत पक्ष नसल्याने पक्षाच्या उमेदवारांना विविध चिन्हे निवडावी लागत होती. त्यानुसार भुजबळ यांना मशाल हे चिन्ह मिळाले होते. शिवसेनेच्या वतीने निवडून आले तरी शिवसेना पक्ष नोंदणीकृत नसल्याने त्यांची गणना अपक्ष आमदार म्हणूनच होत असे.

## शिंदे गटाला मिळाले ढाल तलवार

निवडणूक आयोगाकडून उद्धव ठाकरेंना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे असे नाव आणि धगधगती मशाल हे चिन्ह मिळाले. यानंतर आज शिंदेंनी सकाळीच इमेलद्वारे निवडणूक आयोगाला शंख, ढाल-तलवार व तुतारी फुंकणारा माणूस हे ३ पर्याय पाठवले होते. या तिन्ही पर्यायांमधून शिंदे गटाला ढाल-तलवार हे चिन्ह निवडणूक आयोगाने दिले आहे.

## दिल्ली उच्च न्यायालयात धाव

धन्युष्यबाण हे पक्षचिन्ह गोठवण्याच्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात ठाकरे गटाने दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यावर मंगळवारी किंवा बुधवारी सुनावणी होण्याची शक्यता आहे.

## बाळासाहेब हे नाव कोणाचेही असू शकते-भास्कर जाधव

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मशाल हे निवडणूक चिन्ह मिळाल्याने पहिल्याच प्रयत्नात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे जिंकले आहेत, अशी प्रतिक्रिया शिवसेना नेते, आमदार भास्कर जाधव यांनी व्यक्त केली. आमच्या पक्षाच्या नावात उद्धव ठाकरे आणि बाळासाहेब ठाकरे या दोघांचीही नावे आहेत. आम्ही चिन्हांबाबत जे तीन पर्याय दिले होते, त्यापैकी एक मिळाला आहे. म्हणून आम्ही आनंदी आहोत. शिंदे गटाला "बाळासाहेबांची शिवसेना' हे नाव देण्यात आले आहे. पण बाळासाहेब हे नाव कोणाचेही असते, अशा शब्दांत जाधव यांनी शिंदे गटाला चिमटा काढला आहे. आमच्या नावात बाळासाहेब ठाकरे हे नाव आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

## बाळासाहेबांच्या विचारांवर वाटचाल करणार-दीपक केसरकर

"बाळासाहेबांची शिवसेना' हे नाव मिळाल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे प्रवक्ते दीपक केसरकर यांनी आनंद व्यक्त केला. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर पुढील वाटचाल करणार आहोत. हिंदूत्वाचा विचार घेऊनच आम्ही काम करणार असून चिन्हाबाबत निवडणूक आयोगाकडे मंगळवारी पर्याय दिले जातील, असे त्यांनी सांगितले. तसेच अंतिमत: धनुष्यबाण चिन्ह आम्हालाच मिळेल, असा विश्वासही केसरकर यांनी व्यक्त केला.

# जिल्ह्यातील विधान परिषदेची जागा राहणार रिक्त

## निवडणूक लांबण्याचे संकेत: केंद्रीय निवडणूक आयोगाने अहवाल मागविला



**खेमेंद्र कटरे/गोंदिया:** विधान परिषदेच्या सदस्य पदाचा कार्यकाळ ५ डिसेंबरला संपणार आहे. यामुळे केंद्रीय निवडणूक आयोगाने रिक्त जागेवर निवडणूक घेण्यापुर्वी जिल्हा निवडणूक विभागाकडे अहवाल मागविला आहे. दरम्यान गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील नगरपरिषद व पंचायतीचा कार्यकाळ संपला असन निवडणुक न झाल्याने विधानपरिषदेची ही निवडणूक लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.

५ डिसेंबर २०२२ ला विधान परिषदेची जगा रिक्त होणार आहे. या जागेसाठी वेळेपुर्वी निवडणूक घ्यावी लागते. परंतु यावर्षी स्थानिक स्वराज्य संस्थांचा कार्यकाळ संपल्यामुळे विधान परिषदेच्या मतदारांवरच प्रश्नचिन्ह आहे. यामुळे निवडणुक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये ७५ टक्क्यापेक्षा जास्त मतदार आहेत का, अशी विचारणा केली आहे.गोंदिया भंडारा जिल्ह्यात अंदाजे प्रत्यक्षात ६० टक्केच मतदार आहेत. कार्यकाळ संपल्यामुळे इतर जागा रिक्त झाल्या आहे. यामुळे विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी प्रतीक्षा करावी लागण्याची शक्यता आहे.

सध्या या जागेवर भाजपचे डॉ.परिणय फुके हे २०१६ मध्ये निवडून गेलेले आहेत.त्यांनी राष्ट्रवादी काँगेसचे राजेंद्र जैन यांचा पराभव केलेला होता.या निवडणुकीतही दोन्ही उमेदवार एकमेकाविरुध्द कायम राहतात की दोन्ही पक्ष उमेदवार बदलतात याकडेही लक्ष लागले आहे.

### यांनाच असतो मतदानाचा अधिकार

विधान परिषदेसाठी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगर परिषद नगरसेवक, नगर पंचायत सदस्य यांनाच मतदानाचा अधिकार आहे. नगरपंचायत व परिषदेत प्रशासक कार्यरत आहे. यामुळे या पदावर नव्याने निवडून आलेल्या सदस्यांनाच मतदान करता येणार आहे.


### याच ठिकाणी आहेत कार्यरत मतदार

देवरी, अर्जुनी-मोरगाव, सडक-अर्जुनी, सालेकसा नगर पंचायत. गोंदिया, तिरोडा नगर परिषदेचा व गोरेगाव नगर पंचायतीचा कार्यकाळ संपलेला आहे. आमगाव या नवीन नगर पंचायतीची निवडणूक होणार आहे. त्यामुळे ही मतदार संख्या विधान परिषदेसाठी पुरेशी नाही.

### असे आहे मतदार

जिल्ह्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषद आणि नगरपंचायतीचे ५०० च्यावर सदस्य आहेत.एकूण मतदारांच्या तुलनेत हा आकडा ६३ टक्केच आहे. यामुळे विधान परिषदेची रिक्त जागा भरण्यासाठी निवडणुकीची प्रतीक्षा करावी लागणार.

# न्या.महेंद्र चांदवानी यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीपदी नियुक्ती



**गोंदिया**-महेंद्र चांदवानी यांची मुंबई उच्च न्यायालयात अतिरिक्त न्यायमुर्ती पदी नियुक्ती करण्यात आलेली आहे. सर्वोच्च/न्यायालयाच्या कोलोजीअममध्ये गेल्या ७ सप्टेंबर २०२२ रोजी त्यांची मुंबई उच्च न्यायालयात अतिरिक्त न्यायमूर्तीपदी नियुक्ती करण्याची शिफारस केंद्र सरकारला केली होती. त्यांची हायकोर्टात न्यायमूर्तीपदी नियुक्ती करण्यात आलेली आहे.

चांदवानी हे मुळचे गोंदियाचे रहिवासी आहेत. वकीलीची पदवी घेतल्यानंतर सुरूवातीच्या काळात त्यांनी गोंदिया न्यायालयात प्रॅक्टीस देखील केली होती.०२ मे २००८ रोजी त्यांची जिल्हा न्यायाधिश पदी नियुक्ती झाली.त्यांनी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश म्हणून कार्य केले तसेच ते मुंबई उच्च न्यायालयात महाप्रबंधक म्हणून कार्यरत होते.

त्यांना मुंबई उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपिठ येथे कार्यभार देण्यात आला आहे.त्यांच्या उच्च न्यायालयात न्यायमूर्तीपदी झालेल्या नियुक्ती बद्दल गोंदिया न्यायालयातील न्यायाधीश व अधिकाऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.अशी माहीती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, गोंदिया यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# कार्यकर्त्यांनो जनतेच्या समस्या सोडविण्याकरीता काम करा : ना.मुनगंटीवार




**गोंदिया** : आपला पक्ष फक्त निवडणूक जिंकणारा नसून शेतकरी, कामगार व जनतेचे हृदय जिंकणारा असायला पाहिजे. मी एकटा हे सर्व करूशकणार नसून मला आपली साथ व सहकार्य हवे आहे. गाव, बुथ वार्डातील सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्याकरीता कार्य करावे लागेल. भारतीय जनता पार्टी लोकाभिमुख पक्ष असून जनतेच्या इच्छा, आकांक्षा पूर्ण करण्याकरीता जोमाने कार्य करा, असे आवाहन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी कार्यकर्त्यांना केले.

येथील श्री जलाराम लॉन मध्ये आयोजित भाजप कार्यकर्ता मेळावा व सत्कार सोहळ्यात बोलत होते. भाजपा जिल्हाध्यक्ष केशवराव मानकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या मेळाव्यात प्रामुख्याने खा.सुनिल मेंढे, खा.अशोक नेते, आ.डॉ.परिणय फुके, आ.विजय रहांगडाले, जि.प.अध्यक्ष पंकज रहांगडाले, माजी मंत्री राजकुमार बडोले, माजी आमदार गोपालदास अग्रवाल, रमेश कुथे,भेरसिंह नागपुरे,खोमेश रहांगडाले, माजी जि.प.अध्यक्ष नेतराम कटरे, विजय शिवणकर,जिल्हा संपर्क प्रमुख विरेंद्र अंजनकर,अशोक इंगळे,प्रदेश कार्यकारिणी सदस्य रचना गहाणे, सभापती स्नेश कुथे, जिल्हा महामंत्री संजय कुलकणी, लायकराम भेंडारकर, मदन पटले, सुभाष आकरे आदि उपस्थित होते. पालकमंत्री मुनगंटीवार यांचे यावेळी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून सत्कार करण्यात आला.

ना.मुनगंटीवार पुढे बोलताना म्हणाले, इतर राजकीय पक्ष व भारतीय जनता पार्टीमध्ये मोठे फरक आहे. इतर पक्षात मी व माझे कुटूंब असे चित्र आहे. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी माझा देश-माझे कुटूंब असे सांगतात. पंडीत दिनदयाल उपाध्याय यांचा एकात्म मानववादच्या विचाराने आपण पुढे जात असून श्रध्देय लक्ष्मणराव मानकर यांच्या काळापासूनच जिल्हयाचे संघटन हे सुरूवातीपासूनच आदर्श राहिलेले आहे. कार्यकर्त्यांनो मोठ्या मनाने कार्य करा. मोठ्या विपरीत प्रवाहात काम करून आपण इथपर्यंत आलो आहोत. जिल्हयाच्या विकासासाठी पालकमंत्री म्हणून मी पूर्ण शक्तीनिशी काम करणार असून तुमच्या पाठिशी सदैव उभा राहणार आहे. आजघडीला महात्मा गांधी यांचे विचार अंमलात आणून लोकांच्या मना-मनात पोहोचविण्याची गरज असल्याचेही ते म्हणाले.

लवकरच पालकमंत्री कार्यालय येथे सुरू होणार असून आपले निवेदन देताना त्यावर आपले संपर्क क्रमांक व पत्ता अवश्य लिहावे, असेही त्यांनी सांगितले. प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष केशवराव मानकर यांनी केले. याप्रसंगी खासदार सुनील मेंढे, खासदार अशोक नेते, आ. डॉ. परिणय फुके, आ. विजय रहांगडाले आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.संचालन विरेंद्र अंजनकर यांनी केले.

# प्रदेशाध्यक्ष आ.चंद्रशेखर बावनकुळे बुधवारी गोंदिया दौऱ्यावर



**गोंदिया** : महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आ. श्री चंद्रशेखर बावनकुळे मंगळवार दि. १२ ऑक्टोबर रोजी गोंदिया जिल्ह्याच्या दौ?यावर येत असून त्यांच्या स्वागताची गोंदिया भाजपातर्फे जय्यत तयारी करण्यात आल्याची माहिती आमदार विजय रहांगडाले व जिल्हाध्यक्ष केशवराव मानकर यांनी दिली.

प्रदेशाध्यक्ष श्री बावनकुळे गोंदिया जिल्हा दौरा संघटनात्मक बांधणी व भेटी यासाठी आहे.

जलराम लॉन येथे सकाळी ११.३० वा. ते जिल्हा भाजपाची भाजपाचे संघटनात्मक बैठक घेतील व मार्गदर्शन करतील. त्यानंतर सायंकाळी ०५.०० ते ५.३० दरम्यान युवा वॉरिअर्स शाखा उद्घाटन, सायंकाळी ६ ते ९.४५ या कालावधीत ते विविध मान्यवरांना भेट देतील.

यानंतर सायंकाळी ०५.४५ वा. कारंजा येथे बूथ कमिटी बैठक, याशिवाय संघटनात्मक बैठकी तसेच भेटी यादरम्यान होणार आहेत. प्रदेशाध्यक्षांच्या स्वागताच्या रॅलीसाठी गोंदिया जिल्हा पदाधिकारी, आमदार, आघाडी व मंडलांचे पदाधिकारी परिश्रम घेत आहे.

# भंगार वाहने रस्त्यावर धूळखात उभी



**गोंदिया:** शहरात अनेक ठिकाणी भंगार वाहने बेवारस स्थितीत रस्त्यावर, रस्त्याकडेला साईडपट्टीवर धूळखात उभी आहेत. त्यामुळे वाहतुकीला अडथळा होत आहे. या वाहनांमुळे शहराचे विद्रुपीकरण होत आहे. भंगार वाहनांची विल्हेवाट लावली जात नसल्याने हा प्रकार वाढला आहे. नगर परिषद प्रशासनाने ही बाब गांभिर्याने घेऊन ही वाहने जप्त करणे आवश्यक आहे.

वाहन जुने झाल्यानंतर त्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी वाहनमालकाची असते. त्यासाठी "आरटीओ' कार्यालयाकडून स्क्रॅपेजची ऑर्डर घ्यावी लागते. रितसर कार्यवाही करुन भंगार वाहनाची विल्हेवाट लावावी लागते. मात्र, वाहन मालकांकडून ही कार्यवाही होत नाही. रस्त्यावर, गल्लीबोळात वाहन बेवारस स्थितीत ठेवले जातात. नगर पालिका क्षेत्रात अशी अनेक वाहने बेवारस स्थितीत रस्त्यावर, रस्त्याच्या कडेला धूळखात उभी आहेत. त्यांचा गैरवापर होऊ शकतो. अशा वाहनांमुळे शहराचे विद्रुपीकरण होत आहे. ही वाहने वाहतुकीला अडथळा बनली आहेत. शहरात अनेक ठिकाणी रस्त्यांवर, फूटपाथवर अतिक्रमणे झाली आहेत.

रस्त्याकडेला असलेली दुकाने, गॅरेजजवळ अनेक वाहने रस्त्यावरच उभी असतात. त्यामुळे रुंद रस्ताही अरुंद झाला आहे. अशातच अनेक रस्त्यांवर बेवारस स्थितीत भंगार वाहने धूळखात उभी आहेत. त्यांचाही वाहतुकीला मोठा अडथळा बनला आहे. रस्त्यावर, रस्त्याच्या कडेला, गल्ली बोळात, सार्वजनिक ठिकाणी बेवारस स्थितीत उभी असलेली ही वाहने हटविण्यासाठी पालिका व संबंधिक शासकीय यंत्रणांनी कार्यवाही सुरू करणे आवश्यक आहे.

## अपघाताला आमंत्रण

गोंदिया शहरात मोठ्या प्रमाणात बेवारस भंगार वाहने रस्त्यावर धूळखात उभी आहेत. मात्र, या वाहनांची विल्हेवाटल वाहनमालकांकडून केली जात नाही. हे वाहन अपघाताला आमंत्रण देत आहेत. त्यामुळे नगर परिषद प्रशासन व संबंधित शासकीय यंत्रणांनी कार्यवाही करणे गरजेचे झाले आहे.

## दुरुस्तीच्या नावावर वाहन रस्त्यावर

शहरात अंतर्गत रस्त्यांवर बेवारस वाहन उभी असताना मुख्यमार्गावरही अनेक ठिकाणी वाहनांच्या रांगा दिसून येतात. विशेषत: शहातील मनोहर चौक ते आमगाव व गोरेगाव,तिरोडा मार्गावर अनेक वाहन दुरुस्ती करणाऱ्या कारागिरांचे गॅरेज असून या गॅरेजमध्ये वर्षांपासून बरीच वाहने धुळखात पडून असल्याचे दिसून येते. एकंदरीत दुरुस्तीच्या नावावर ही वाहने रस्त्यावर ठेवली जात असल्याचा प्रकार असल्याचे दिसते.

# पंचसूत्रीतून साधणार जिल्ह्याचा सर्वांगीण विकास,बदलेल चित्र-ना.मुनगंटीवार



**गोंदिया:** कुठल्याही जिल्ह्याचा विकास हा तेथील मुलभूत पायाभूत सुविधांच्या आधारावर होत असतो. गोंदिया जिल्ह्याचा सर्वांगीण विकासासाठी आरोग्य, शिक्षण, सिंचन, रोजगार आणि कृषी या पाचही घटकांतील सर्व समस्या दूर करुन जिल्ह्याला सर्वच बाबतीत सक्षम करणार, याच पाच गोष्टीला सर्वात प्रथम आपले प्राधान्य असणार असून ही जिल्ह्याच्या विकासाची पंचसूत्री असणार असल्याचे राज्याचे वनमंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

पत्रकार परिषदेला सुनील मेंढे, अशोक नेते, जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, आमदार विजय रहांगडाले, विनोद अग्रवाल, परिणय फुके व अधिकारी उपस्थित होते.

ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले की गोंदिया जिल्ह्याचा नियोजन आराखडा तयार करण्यात आला आहे. हा आराखडा सर्वकष तयार व्हवा, यातून जिल्ह्याचे भविष्याचे चित्र स्पष्ट व्हावे अशा सुचना सर्व अधिकाऱ्यांना केल्या आहेत.

यात सर्वच पक्षाच्या आमदारांचे प्रश्न आणि त्यांचे मत ग्राह्य धरुन ते तयार केले जाईल. १४ ऑक्टोबरपर्यंत हा सर्वकष आराखडा तयार केला जाणार असून त्यानंतर जिल्ह्याचा विकासाला सुरुवात केली जाईल. प्रशासन हे लोकाभिमुख करण्यावर भर असेल.

सर्वसामान्यांना त्यांच्या समस्या व प्रश्न मांडण्यासाठी पायपीट करावी लागू नये यासाठी एक विशेष ॲप कार्यक्रम तयार करुन मोबाईलवर या समस्यांचे निराकरण केले जाईल, असे सांगितले.

## हत्तींना परत पाठविण्यासाठी उपाययोजना सुरु, समिती गठित

गोंदिया: मागील पंधरा दिवसांपासून अर्जुनी मोरगाव तालुक्यातील गोठणगाव परिसरात हत्तीचे वास्तव्य आहे. या हत्तीमुळे शेतपिकांचे नुकसान होत आहे. तसेच गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या हत्तींना ते आलेल्या प्रातांत परत पाठविण्यासाठी एक समिती गठित करण्यात आली असल्याची माहिती राज्याचे वनमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीर यांनी सोमवारी गोंदिया येथे सांगितले.

अर्जुनी मोरगाव तालुक्यातील गोठणगाव, येरंडी, पवनी धाबे, महागाव या परिसरात हत्तींच्या कळपाने चांगलाच धुमाकुळ घातला आहे. या परिसरातील दीडशे ते दोनशे एकरमधील पिकांचे हत्तींमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. यासंबंधीच्या तक्रारी सुद्धा वन विभागाला प्राप्त झाल्या आहेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना निश्चितपणे आर्थिक मदत केली जाईल, एकही नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही असे ना.सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले. हत्तींच्या कळपाच्या हल्ल्यात ठार झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना २० लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार असल्याचे सांगितले.

## पांगोली नदीचे पुनरूज्जीवन करणार

गोंदिया शहरालगत वाहणाऱ्या पांगोली नदीचे पुनरुज्जीवन करण्याचा मुद्दा खा.सुनील मेंढे यांनी नियोजन समितीच्या बैठकीत उपस्थित केला. त्याला मंजूरी दिली असून पांगोली नदीचे पुनरुज्जीवन केले जाईल. यासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही ना.मुनगंटीवार यांनी दिली.

## धानाला बोनस मिळणारच

धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस मिळावा ही सरकारचीसुद्धा भूमिका आहे. याचा लाभ शेतकऱ्यालाच मिळावा. यातील गैरव्यवहार दूर व्हावा यासाठी उपाययोजना केल्या जात आहे. त्यासाठी उपसमिती गठित करण्यात आली असून धान उत्पादक शेतकऱ्यांना निश्चित बोनस मिळेल अशी ग्वाही ना.गुनगंटीवार यांनी दिली.

## नरभक्षी वाघाला जेरबंद करण्याचे आदेश

भंडारा, गोंदिया, गडचिरोलीमध्ये धुमाकुळ घातलेल्या सिटी-१ या नरभक्षी वाघाला जेरबंद करण्याचे आदेश वनविभागाला दिले आहे. तसेच जंगलावर असणारे लोकांचे अवलंब कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यासाठी तेंदुपत्ता संकलन करणाऱ्याची बोनसची रक्कम ७२ कोटी रुपयांनी वाढविली असल्याचे पालकमंत्री मुनगंटीवार यांनी सांगितले.

## नुकसानभरपाई देण्यास विलंब झाल्यास व्याज देणार

वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना ३० दिवसांच्या आत नुकसानभरपाई दिली जावी, असा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच यापेक्षा अधिक विलंब झाल्यास संबंधित व्यक्तीच्या कुटुंबियांना व्याजासह रक्कम देण्याची तरतूद केली असल्याचे ना.मुनगंटीवार यांनी सांगितले.

## संपादकीय

# धनुष्यबाण निसटले

शनिवारचा दिवस हा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना दैवत मानणाऱ्या महाराष्ट्रातीलच नाही, तर देशाच्या कानाकोपऱ्यांत शिव-सेना या चार अक्षरांवर मनापासून प्रेम करणाऱ्या शिवसैनिकांसाठी खऱ्या अर्थाने काळा दिवस ठरला. एकीकडे रक्ताचा वारसा, तर दुसरीकडे वैचारिक वारसा असा हा संघर्ष चिघळला आहे. अर्थात बाळासाहेबांच्या हयातीत व नंतरही उद्धव ठाकरेंना सर्व "आयते' मिळालेले आहे; परंतु शिंदेंपासून सर्व आमदार, खासदार इतकेच नाही, तर नगरसेवकांनी संघर्ष करत आपल्या विभागामध्ये शिवसेना वाढविली होती व नावारूपालाही आणली होती; परंतु मुख्यमंत्री बनलेल्या ठाकरेंना राज्यही सांभाळता आले नाही व पक्षप्रमुख म्हणून संघटनाही सांभाळता आलेली नाही. त्यांच्यामुळेच संघटनेला आता नाव व चिन्ह गमावावे लागले असल्याचा संताप आता शिवसैनिकांकडून उघडपणे व्यक्त केला जात आहे. शिव-सेनाप्रमुख बाळासाहेबांची शिवसेना, त्या शिवसेनेचा धनुष्यबाण आता प्रचारात वापरता येणार नाही. शिंदे गट व ठाकरे गट यांच्यामध्ये शिवसेना व धनुष्यबाण यावर सुरू असलेल्या वादावर केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेनेचे "धनुष्य-बाण' हे निवडणूक चिन्ह गोठवण्याचा हंगामी आदेश शनिवारी रात्री उशिरा जारी केला. उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे या दोन्ही गटांना अंधेरी-पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीत या आदेशामुळे शिवसेनेच्या चिन्हाचा आता वापर करता येणार नाही. न्यायालयाच्या या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ माजली आहे.

मुळात असा निर्णय लागण्याची कुणकुण शिवसैनिकांना होतीच. असा निर्णय लागलाच, तर पर्यायी चिन्ह काय असणार? शिवसेना नावही स्थगित झाले अथवा गोठविले, तर पर्याय काय असणार? याचीही संभाव्य चर्चा शिंदे गट व ठाकरे गटामध्ये शिवसेना व धनुष्यबाण यावरुन वाद सुरू झाला, त्या दिवसापासून सुरू होती. अर्थात धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह शिवसेनेचे सुरुवातीपासून नव्हते. ढाल, तलवार, रेल्वे इंजिन, मशाल ते धनुष्यबाण असा शिवसेनेच्या निवडणूक चिन्हाचा प्रवास होत गेला आहे. शनिवारी झालेल्या बैठकीनंतर केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यालयात शिवसेनेचे निवडणूक चिन्ह गोठवण्याचा निर्णय घेण्यात आला. ठाकरे व शिंदे या दोन्ही गटांना शिवसेना हे पक्षाचे मूळ नाव वापरण्यासही मनाई करण्यात आली आहे. स्वतःच्या पक्षासाठी नव्या नावाची आणि नव्या निवडणूक चिन्हाची आता दोन्ही गटांना निवड करावी लागणार आहे. निवडणूक आयोगाकडे सोमवारी, १० ऑक्टोबरला दुपारी १ वाजेपर्यंत नाव आणि चिन्हांचे तीन पर्याय सादर करण्याचा आदेशही देण्यात आला आहे. अर्थात शिवसेना व धनुष्यबाण हे दोन्ही गोठविण्याची वेळ केवळ उद्धव ठाकरेंमुळेच आलेली आहे, असा सूर आता दबक्या आवाजामध्ये शिवसैनिकांकडूनही आळविला जात आहे. ५४ आमदारांपैकी ४० आमदार ठाकरे यांचे नेतृत्व अमान्य करत शिवसे-नेतच राहून वेगळी राजकीय चूल मांडतात. लोकसभेतील १० खासदारही या आमदारांची पाठराखण करत उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाला जय महाराष्ट्र करत ४० आमदारांची पाठराखण करतात. आमदार-खासदारांपर्यंतच हे वेगळी भूमिका तसेच वेगळी राजकीय चूल मांडण्याचे प्रकरण सीमित न राहता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पदाधिकाऱ्यांपर्यंत पोहोचले आहे.

शिवसेनेत कार्यरत असणाऱ्या नगरसेवकांपासून, लोकप्रतिनिधींपासून देशातील सर्वोच्च सभागृहात म्हणजेच संसदेतील खासदारांनी ठाकरेंच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण करणे, लोकप्रतिनिधींनीच नाही, तर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी, युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी, महिला रणरागिणींनीदेखील ठाकरे गटाची साथ सोडणे. एकवेळ महाराष्ट्रातील नाराजी समजण्यासारखे असू शकते; परंतु महाराष्ट्राबाहेर ज्यांनी शिव-सेना वाढविली, त्या त्या राज्यात शिवसेनेचे अस्तित्व टिकवून ठेवण्याची किमया ज्या पदाधिकाऱ्यांनी केली, त्यांनीही एकनाथ शिंदेंच्याच नेतृत्वाची उघडपणे पाठराखण केली. हे सर्व कशाचे चित्र आहे? अनेकजण साथ सोडून गेले. हे निश्चितच उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाचे, राजकीय कर्तृत्वाचे, निर्णयाचे अपयश मानावे लागेल. अशा वेळी आपल्या सोडून जाणाऱ्या सहकाऱ्यांना समजावण्याची, त्यांचे रुसवे-फुगवे काढण्याची, त्यांची मनधरणी काढण्याची, त्यांची नाराजी जाणून घेण्याची भूमिका उद्धव ठाकरेंनी करणे आवश्यक होते; परंतु स्वतःच्याच अंहकारात, हेकेखोर प्रवृत्तीत रममाण असलेल्या उद्धव ठाकरे यांनी संघटनेला पडणारे खिंडार बुजविण्याचे आणि सोडून जाणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांना थोपविण्याचे कोणतेही प्रयत्न केले नाहीत. त्यांनी गद्दार, खोके याचाच एककलमी नारा देण्यात समाधान मानले. सोडून जाणाऱ्यांचे अधिकाधिक चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न ठाकरेंनी संघटनात्मक बैठकांमध्ये, मीडियाशी बोलताना तसेच जाहीर सभांतून केला. खरे पाहता संघटनेला पडत असलेले खिंडार पाहून ठाकरेंनी स्वतःचे आत्मपरीक्षण करणे आवश्यक होते; परंतु त्यांचा स्वभाव व कार्यप्रणाली पाहता ती अपेक्षाही नव्हती.

आज ज्या घडामोडी घडत आहेत, त्यास सर्वस्वी उद्धव ठाकरेच जबाबदार आहेत. शिवसेनाप्रमुखांचा वारस म्हणून ठाकरे टाहो फोडत असले तरी सोडून जाणारे शिवसेनेचे पदाधिकारी, आमदार, खासदार, नगरसेवक हे आपण शिवसेनाप्रमुखांच्या विचारांचे वारसदार असल्याचे समाजासमोर सांगत होते. संघटनात्मक संख्याबळ, लोकप्रतिनिधींचे संख्याबळ ठाकरेंना सोडून शिंदेंच्या समर्थनार्थ गेले. ज्या संघटनेला टिकविण्याची भाषा ठाकरे वापरत होते. त्या संघटनेची कागदपत्रे जमा करण्यास त्यांना विलंब का झाला? वैचारिक वारसदार सांगणारे एकीकडे व वारस म्हणून वारसा सांगणारे दुसरीकडे, असे शिवसेनेतील चित्र गेल्या काही दिवसांमध्ये उभ्या महाराष्ट्राला पाहावयास मिळाले. रोम जळत असताना व्हायोलिन वाजविणारा राजा आणि संघटना फुटत असतानाही पुढे येऊन खिंडार बुजविण्यासाठी पुढाकार न घेणारे ठाकरे यात फारसा फरक नाही. शिवसैनिकांचा श्वास असणारे धनुष्यबाण आता गोठविले गेले आहे. अंधेरीच्या निवडणुकीत नव्याने चिन्ह घेऊन ठाकरे गटाला उतरावे लागणार आहे. ही वेळ ठाकरेंमुळेच निर्माण झाली आहे. नगरसेवक ते खासदार, गटप्रमुख ते राज्यप्रमुख सोडून जातात, आता धनुष्यबाणही गमवावे लागले. रक्ताच्या वारसाने हेच कर्तृत्व केल्याचा संताप आता शिवसैनिक व्यक्त करू लागले आहेत.

## भटक्या जमातीच्या लोकांना आजही पिण्याचे पाणी देण्यास नकार

**सडक अर्जुनी:** तालुक्यातील सिंदीबिरी गटग्रामपंचायत अंतर्गत ग्राम बिरी येथे भटक्या जमातीच्या लोकांचे वास्तव्य आहे.



बिरी येथील पाणी पुरवठा योजनेंतर्गत नळाचे पाणी मागिल सात दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे येथील नागरिकांना बोअरवेलचे दुषित पाणी प्यावे लागत आहे.

ग्रामपंचायत प्रशासन व पाणीपुरवठा विभागाचे दुर्लक्षामुळे जलजीवन व शुध्द पाणी पुरवठा योजना ही नागरिकांना शुद्ध पाण्यापासून वंचित ठेवित आहे. ग्रामपंचायत पदाधिकारी सांगतात की, नागरिकांनी घर टॅक्स न भरल्याने सदर योजना बंद केली आहे.वास्तविक कोविड-१९ कोरोना काळात लोकांना स्वतःचे घर सांभाळणे कठीण झाले होते. त्यामुळे घर टॅक्स भरू शकले नाही. बिरी येथे भटक्या जमातीचे २० घरांचे कुटुंब असून त्यांची परिस्थिती हलाखीची आहे. इतर सधन लोकांसारखे घरी विहीर किंवा बोअरवेल खोदू शकत नाही. त्यामुळे दुषित पाण्याचा वापर करीत आहेत. गावातील सधन लोकांकडे बोअरवेल असून या भटक्या जमातीच्या लोकांना पाणी भरू देत नाही. आजही भटक्या जमातीच्या लोकांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदललेला नाही.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता ,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

## "हॅलो नव्हे-वंदे मातरम"




राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीनिमित्त राज्यभरात "हॅलो नव्हे – वंदे मातरम" या अभियानाचा शुभारंभ झाला. या अभियानाविषयी...

महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त राज्यभरात दि. २ ऑक्टोबरपासून "हॅलो नव्हे-वंदे मातरम" या अभियानाचा शुभारंभ झाला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यभरात हे अभियान यशस्वी करण्याचा निर्धार सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. विशेष म्हणजेच गांधी जयंती दिनीच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या अभियानाचा शुभारंभ वर्धा येथून झाला.

"जनगणमन"हे आपले राष्ट्रगीत आणि "वंदे मातरम" हे राष्ट्रीय गाणे हे सर्वमान्य झाले आहे. आजही अनेक शासकीय कार्यालयांत संपर्क साधल्यास अधिकारी व कर्मचारी यांच्या संवादास "हॅलो' या शब्दाने सुरुवात होते. काही ठिकाणी "जय हिंद' तर काही ठिकाणी "नमस्ते' असेही संबोधले जाते. शासकीय कार्यालयातील दूरध्वनीवरून होणारे संवाद व समोरासमोरून आल्यानंतर होणारे संवाद यामध्ये जर "वंदे मातरम" हा शब्द वापरला तर त्याला एक प्रकारचे राष्ट्रीय स्वरुप येऊ शकते,

"वंदे मातरम" हा फक्त नारा किंवा संबोधन नसून राष्ट्रभक्तीचा जाज्वल्य इतिहास आहे. "वंदे मातरम"बाबत प्रचार-प्रसार व जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी या गीताचा इतिहास व त्याच्याशी निगडित घटना यांचा प्रचार व प्रसार करण्यात येणार आहे.

वंदे मातरम हे गीत बंकिमचंद्र चटर्जी यांनी १८७५ या वर्षामध्ये लिहिले होते. संस्कृत भाषेतील हे मूळ गीत पाच कडव्यांचे होते. मात्र सध्या पाचपैकी फक्त एक कडवेच गायले जाते. १८९६ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात हे गीत सर्वप्रथम गायले गेले. १९०५ ला झालेल्या बंगालच्या फाळणी दरम्यान, "वंदे मातरम" हा परवलीचा शब्द होता. अनेक क्रांतिकारकांनी या गीताचा उद्घोष करत बलिदान दिले. "इन्कलाब जिंदाबाद" व "वंदे मातरम" या दोन शब्दांनी स्वातंत्र्य चळवळ भारावून गेली होती. या गीतावर व त्याच्या गायनावर इंग्रजांनी बंदीही घातलेली होती. मात्र तत्कालीन राजकीय पक्ष, क्रांतिकारक व सर्वसामान्य नागरिक यांनी ही बंदी झुगारून वंदे मातरम गायनास सुरुवात केली होती.

स्वातंत्र्य चळवळीतील धगधगत्या अग्निकुंडात बलिदान देणाऱ्या अनेक वीरांच्या मुखातून "वंदे मातरम" हा शब्द आला होता. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात मंत्र ठरलेले हे गीत सर्वमान्य होते. दिनांक १४ ऑगस्ट १९४७ रोजी झालेल्या संविधान परिषदेच्या बैठकीची सुरुवातही या गीताने झाली होती. १९५० मध्ये तत्कालीन राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांनी "वंदे मातरम" या गीताबद्दल पुढीलप्रमाणे नमूद केले होते :

शब्दों व संगीत की वह रचना जिसे जन गण मन सम्बोधित किया जाता है, भारत का राष्ट्रगान है; बदलाव के ऐसे विषय, अवसर आने पर सरकार अधिकृत करे और वन्दे मातरम गान, जिसने कि भारतीय स्वतन्त्रता संग्राम में ऐतिहासिक भूमिका निभायी है; को जन गण मन के समकक्ष सम्मान व पद मिले। (हर्षध्वनि)। मैं आशा करता हूँ कि यह सदस्यों को सन्तुष्ट करेगा। (भारतीय संविधान परिषद, द्वादश खण्ड, २४-०१-१९५०).

या विधानावरून या गीताची महती स्पष्ट होते. मद्रास उच्च न्यायालयाने शाळा व महाविद्यालये यांमधून "वंदे मातरम" हे गीत देशभक्तीची भावना रुजविण्याकरिता आठवड्यातून किमान एकदा तरी गायले जावे, असा निर्णय दिला होता. थोडक्यात "वंदे मातरम" हा शब्द सर्वांसाठीच प्रेरणादायी व सन्माननीय आहे.

"हॅलो नव्हे-वंदे मातरम" या अभियानाबाबत बोलताना मंत्री श्री.मुनगंटीवार म्हणतात की, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना स्वातंत्र्य लढ्यातील दिशादर्शक आणि क्रांतीचे निर्देशक असणाऱ्या या गीताच्या सुरुवातीच्या दोन शब्दांनी म्हणजेच "वंदे मातरम" ने शासकीय कार्यालयातील दूरध्वनी संभाषणाची सुरुवात व्हावी, अशी जनसामान्यांची इच्छा होती. त्यास अनुसरुन हा निर्णय घेण्यात आला आहे. आजही अनेक शासकीय कार्यालयात संपर्क साधल्यास अधिकारी व कर्मचारी यांच्या संवादास हॅलो या शब्दाने सुरुवात होते. काही ठिकाणी "जय हिंद' तर काही ठिकाणी नमस्ते असेही संबोधले जाते. वास्तविक पाहता दोन व्यक्ती एकमेकांशी होणाऱ्या संवादात, सुरुवातीस संबोधित करताना वेगवेगळी अभिवादने वापरताना आढळून येतात. महाराष्ट्रात "नमस्कार' व "राम राम' हे दोन शब्द आजही मोठ्या प्रमाणात संबोधनात्मक वापरण्यात येतात. त्याशिवाय हॅलो, हाय, गुड मॉर्निंग सारखे शब्दही दिसून येतात. वेगवेगळे समूह, समुदाय, धर्म यांमध्येही अभिवादन करण्याच्या विविध प्रथा आहेत. वैयक्तिक व सार्वजनिक जीवनात या प्रथा सर्वजण आपापल्या परीने जोपासत आहेत व त्या जोपासण्याचा त्यांना अधिकारही आहे. शासकीय कार्यालयात किंवा शासन व्यवहारात दूरध्वनीवरून किंवा समोरासमोर भेटल्यानंतर कोणत्या शब्दाने अभिवादन करावे याबाबत स्पष्ट निर्देश कुठेही उप-लब्ध नाहीत. त्यामुळे शासकीय कार्यालयातील दूरध्वनीवरून होणारे संवाद व समोरासमोरून आल्यानंतर होणारे संवाद यामध्ये जर "वंदे मातरम" हा शब्द वापरला तर त्याला एक प्रकारचे राष्ट्रीय स्वरूप मिळेल असे मला वाटते.

लघु चित्रपटाच्या माध्यमातून "वंदे मातरम" बाबत जाणीवजागृती करण्यात येणार आहे. "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत सर्व शासकीय कार्यालयांबरोबर निमशासकीय कार्यालये, शासकीय अनुदानित व विना अनुदानित कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, विद्यापीठे, शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था तसेच शासन अंगीकृत उपक्रम व आस्थापना यांना कार्यालयात दूरध्वनी अथवा भ्रमणध्वनीवर अभ्यागत व सहकारी यांना संवाद साधण्याच्या सुरुवातीस हॅलो असे न म्हणता "वंदे मातरम" असे अभिवादन करावे, असे आवाहन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने केले असून, यासाठीची काही मार्गदर्शक तत्त्वे पुढीलप्रमाणे नमूद केली आहेत.

सर्व शासकीय कार्यालयात दूरध्वनीवर/ भ्रमणध्वनीवर अभ्यागत किंवा अधिकारी/ कर्मचारी यांनी संवाद साधल्यास सुरुवातीचे अभिवादन म्हणून "हॅलो" संबोधन न वापरता, "वंदे मातरम"म्हणावे.

शासकीय कार्यालयांबरोबरच निमशासकीय कार्यालये, शासन सहाय्यित/अनुदानित/ अर्थसहाय्यित व इतर स्वरूपाचे साहाय्य असणारी कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा/ महाविद्यालये व शैक्षणिक संस्था तसेच शासन अंगीकृत सर्व प्रकल्प/उपक्रम/आस्थापना येथील कार्यालयांतही दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनीवर अभ्यागत किंवा सहकारी यांनी संवाद साधल्यास, सुरुवातीला "हॅलो" असे न म्हणता "वंदे मातरम" असे संबोधन करावे. तसेच त्यांनी त्यांच्या वैयक्तिक भ्रमणध्वनीवरही संवाद साधतांना "वंदे मातरम" असे संबोधन करावे.

कार्यालय/संस्था येथे दूरध्वनीवरून होणाऱ्या संवादात सुरुवातीस "वंदे मातरम" हे संबोधन वापरले जाईल यासाठी सर्व विभाग प्रमुखांनी सर्व अधिकारी/कर्मचारी यांना प्रोत्साहित करावे.

कार्यालयात/संस्थांमध्ये येणाऱ्या अभ्यागतांनाही सार्वजनिक जीवनात "वंदे मातरम" ने संबोधन करण्याबाबत जाणीव जागृती करावी.

ज्या ठिकाणी स्वयंचलित दूरध्वनी यंत्रणा अस्तित्वात आहे त्या ठिकाणीही हा बदल करण्यात यावा. विविध बैठका/ सभांमध्ये वक्त्यांनी "वंदे मातरम" या शब्दांनी संभाषणाची सुरुवात करावी.

**- वर्षा फडके-आंधळे,**
**वरिष्ठ सहायक संचालक**
**(माहिती)**

## इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाकडील

# शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाने इतर मागास वर्ग प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीने शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत राज्य, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थीना उच्च शिक्षणाकरिता बँकेमार्फत मंजूर केलेल्या २० लाखापर्यंत कर्ज रक्कमेवरील व्याज परतावा महामंडळाकडून वितरीत केले जाते. विद्यार्थ्यांना शैक्षणिक, आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे व त्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे हा शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजनाचा उद्देश आहे.

योजनेचे स्वरुप : राज्यांतर्गत व देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी महत्तम कर्ज मर्यादा १० लाख व परदेशी अभ्यासक्रमासाठी महत्तम कर्ज २० लाख.

लाभार्थीच्या पात्रतेच्या अटी व शती : अर्जदाराचे वय १७ ते ३० वर्षे असावे तो इतर मागासवर्गीय प्रवर्गातील महाराष्ट्राचा रहिवाशी असावा. अर्जदाराची कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामीण व शहरी भागाकरीता ८ लाखापर्यंत असावे. अर्जदार इयत्ता १२ वी ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण असावा तसेच पदवीच्या द्वितीय वर्ष व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारे विद्यार्थी ६० टक्के गुणांसह पदविका उत्तीर्ण असावेत. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी किमान ६० टक्के गुणांसह पदवी उत्तीर्ण असावा. केवळ पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक अभ्यासक्रमाकरीता शासन मान्यता प्राप्त संस्थेमध्ये प्रवेश घेतलेले विद्याथी.

बँकेने मंजूर केलेली संपूर्ण कर्ज रक्कम अर्जदारास वितरीत केल्यानंतर अर्जदारास वितरीत केल्यानंतर अर्जदार व्याज परतावा योजनेसाठी पात्र राहील. राज्य व देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता शैक्षणिक शुल्क, पुस्तके, साहित्य खरेदी व अर्जदाराच्या राहण्याचा व भोजनाचा खर्च समावेश राहील. परदेशी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता फक्त शैक्षणिक शुल्क, पुस्तके, साहित्य खरेदीचा समावेश राहील. अर्जदाराचा सिबील क्रेडिट स्कोअर ०, -१ (म्हणजेच यापूर्वी त्याने कर्ज घेतलेले नसावे) किंवा ५०० पेक्षा जास्त असावा.

व्याजचा परतावा : महामंडळ केवळ बँकेकडून वितरीत केलेल्या रक्कमेवरील जास्तीत जास्त १२ टक्के पर्यंत रक्कमेचा व्याज परतावा नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थींना करेल.

कर्ज प्रस्तावासोबत अपलोड करावयाची कागदपत्रे : अर्जदाराचा इतर मागास प्रवर्गातील जातीचा दाखला. उत्पन्नाचा दाखला. महाराष्ट्राचा रहिवाशी दाखला. अर्जदार व अर्जदाराचे पालक यांचे आधार कार्ड. ज्या अभ्यासक्रमाकरीता शैक्षणिक कर्ज आवश्यक आहे त्या अभ्यासक्रमासाठीची पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका. अर्जदार व अर्जदाराचे पालक यांचे पासपोर्ट आकारातील फोटो. अर्जदाराचा जन्माचा/ वयाचा दाखला. शैक्षणिक शुल्क संबंधित पत्र. शिष्यवृत्ती, शैक्षणिक शुल्कमाफी पात्रतेबाबतचे प्रमाणपत्र. मान्यताप्राप्त संस्थेत प्रवेश घेतल्याचा पुरावा. आधार संलग्न बँक खाते पुरावा.

अभ्यासक्रम : राज्यांतर्गत अभ्यासक्रम - केंद्रीय परिषद, कृषी विद्यापीठ परिषद, शासकीय अनुदानित व खासगी मान्यताप्राप्त (NAAC मानांकन प्राप्त) शैक्षणिक संस्थेत अभ्यासक्रमासाठी शासनमान्य सामाईक पात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व त्यानुसार प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी. परदेशी अभ्यासक्रमासाठी QS (Quacquarelli Symondी) च्या रॅकिंग/गुणवत्ता, पात्रता परीक्षा Graduatc Rccord Exam (GRE), Test of English as a Foreing Language (TOEFL) उत्तीर्ण झालेला विद्यार्थी.

व्याज परतावा व परतफेडीचा कालावधी : शिक्षण पूर्ण केलेल्या अर्जदाराने बँकेने मंजूर केलेल्या कर्जाची नियमित परतफेड केलेल्या हप्तयामधील नियमित असलेल्या व्याज रक्कमेचा परतावा ( कमाल १२ टक्के पर्यंत) महामंडळ अर्जदाराच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये वर्ग करेल. व्याज परतावासाठी जास्तीत जास्त ५ वर्ष कालावधी ग्राह्य धरण्यात येईल.

अर्जदारास नाव नोंदणीसाठी महामंडळाच्या www.msobcfdc.org पोर्टलवरुन आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बी विंग, दुसरा माळा, खोली नं.३ जुनी एमआयडीसी रोड बॉम्बे रेस्टॉरंट उड्डाण पुला जवळ, सातारा व ०२१६२-२९५१८४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

## होमगार्डसना १८० दिवस काम द्या-संघटनेचे पालकमंत्र्यांना निवेदन

**गोंदिया-** पोलिस दलात कायदा आणि सुव्यवस्था सुरळीत राखण्यासाठी खांद्याला खांदा लावून होमगार्ड कर्तव्यावर तैनात असतात. राज्यात सध्या ३९ हजार २०८ होमगार्ड कार्यरत असून, त्यांना वर्षातून कमीत कमी १८० दिवस काम देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला.मात्र या निर्णयानुसार काम देण्यात येत नसल्याने अनेक होमगार्डना यापासून वंचित राहण्याची वेळ आली आहे.याकरीता होमगार्डना १८० दिवस काम देण्यात यावे या मागणीला व गोंदिया समादेशक कार्यालयातील गोंधळाला घेऊन( महाराष्ट्र गृहरक्षक दल) होमगार्ड पथक गोंदियाच्यावतीने जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना १० ऑक्टोंबरला निवेदन देण्यात आले.

यावेळी पालकमंत्री मुनगंटीवार यांनी होमगार्ड पथक गोंदियाच्यावतीने दिलेल्या निवेदनावर विचार करण्याचे आश्वासन देत १८० दिवसा-पेक्षा कमी काम देण्यात येत असल्यास संबधितावर कारवाई करण्यासंदर्भात उपमुख्यमंत्र्याकडे आपण चर्चा करणार असे सांगितले.

होमगार्ड अधिनियमन व नियमातील तरतुदींचा विचार करता वाहतूक नियमन, रुग्णालय, सुरक्षा, शासकीय वसतिगृह सुरक्षा, कारागृहाबाहेर सुरक्षा आदी बंदोबस्तासाठी होमगार्डसना पोलिस कर्मचाऱ्यांसोबत कर्तव्यावर तैनात करावे. जिल्हा कार्यालयांच्या पटावर असलेल्या होमगार्डपैकी ३५ ते ४० टक्के होमगार्ड अशा पद्धतीने कर्तव्यावर तैनात केले जावे. कर्तव्यावर तैनात करण्यात येणारे होमगार्ड साखळी पद्धतीने तैनात करण्यावर भर द्यावा. या होमगार्डची दोन महिन्यानंतर बदली करावी, अशाही सूचना होमगार्ड उपमहासमादेशक यांनी काढल्या आहेत.

महाराष्ट्रासाठी ५३ हजार ८५६ एवढी होमगार्डची संख्या केंद्र सरकारने निश्चित केली आहे. त्यापैकी सद्यस्थितीत राज्यात ३९ हजार २०८ होमगार्ड कार्यरत आहेत. या होमगार्डला वर्षाच्या ५० टक्के दिवस काम मिळावे असे धोरण आहे.मात्र गोंदिया जिल्ह्यातील अनेक होमगार्डना अद्यापही ५० टक्के दिवस कामाचे मिळालेले नसुन अधिकारी आनलाईनच्या माध्यमतून ड्युटी लागत असल्याचे कारण सांगत इतरावंर अन्याय होत असल्याचे अन्याग्रस्त होमगार्डसेच म्हणने आहे. १ मार्च २०१९ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब केले होते, हे विशेष. त्याची अंमलबजावणीही सुरु झाली होती.मात्र राज्यात महाविकास आघाडी सरकार आल्यानंतर परत हे बंद करण्यात आल्याने पुन्हा सुरु करण्याची मागणी होत आहे.

# शाळाबंदीची कुऱ्हाड



गेल्या काही दिवसांपासून ग्रामीण भागातील वीसपेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याच्या चर्चेमुळे दहशतीचे वातावरण तयार झालेले दिसते. विशेषतः शिक्षकांमध्ये याबाबत चर्चा होत असताना समाजाच्या शैक्षणिक भवितव्याबद्दल भयग्रस्त सूर ऐकायला येऊ लागले आहे. तर सरकारी शाळा बंद होऊ शकत नाहीत असाही भाबडा समज अनेक अतिउत्साही शिक्षकांमध्ये दिसून येतो. अशा परिस्थितीत जिल्हा परिषदेच्या अथवा सरकारी शाळा बंद पडल्या तर काय होईल? छोट्या छोट्या खेड्यातील ही बालकं गावाबाहेर घरापासून दूर जाऊन शाळा शिकू शकतील का? त्यांच्यासाठी गा-वात पर्यायी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची व्यवस्था आहे का? अशी प्रश्नावली सर्वांसमोर येईल.

आता ज्या कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याचा विचार केला जात आहे, त्यांची पार्श्वभूमी लक्षात घेता अनेक शाळा छोट्या खेड्यातील अत्यंत कमी लोकसंख्येच्या वस्तीतील, डोंगरदऱ्यातील, पाड्यावरील, वाडीवरील शाळा असू शकतात. या ठिकाणी शाळा काढून खूप कालावधी लोटला असेल याची संभावना अतिशय धूसर आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या प्रक्रियेत समाजाच्या सर्व घटकांपर्यंत शिक्षण पोहचावे या योजनेअंतर्गत अशा शाळा जन्मास आल्या. आणि ज्या गावांमध्ये वर्षानुवर्ष अविद्येचे घनदाट अरण्य होते, तेथे ज्ञानाचा प्रकाश देणारे शाळारुपी दीपस्तंभ उभे राहिले. विद्यार्थ्यांची किलबिल शाळेबाहेर ऐकू येऊ लागली. अनेक गावात तर शाळा म्हणजे विद्यार्थ्यांना जीव की प्राण वाटू लागले. शाळा सुरू होण्यापूर्वी व सुटल्यानंतरही मुलं रोज शाळेच्या अवती भवती पिंगा घालत, खेळत दिसणार नाहीत असं क्वचितच गाव सापडेल. अशा शाळांमधून शिकलेले कुणी डॉक्टर, इंजिनिअर, सरपंच, राजनेता तर कुणी शिक्षक, कुणी कारकून, चपराशी कोणी शेती करणारा, मजुरी करणारा असा हा समाजातील साक्षर माणूस बाहेर पडला. या शाळांनी या माणसांचं काही नुकसान केलं का? या शाळा बंद करणे म्हणजे या माजी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला कूचकामी ठरवणे नव्हे का? या शाळा बंद करणे म्हणजे त्यांच्या शिक्षणाला अमान्य करणे नव्हे? अशा माजी विद्यार्थ्यांच्या शाळा बंद करणे म्हणजे एक प्रकारे त्यांचे शिक्षण नाकारणे, त्यांनी अर्जित केलेली गुणवत्ता नाकारणे, त्यांना शैक्षणिक प्रवाहातून हद्दपार करणे नव्हे काय? गावागावात उभी असलेली शाळा म्हणजे समाजाची सार्वजनिक संपदा होय. शाळा ही समाजाची प्रतिकृती. हक्कानं या शाळेला लोक "आमच्या गावची शाळा' म्हणतात. एखाद्या खाजगी शाळेचा इतक्या आपुलकीने कुठे नामोल्लेख केला जातात?

२० पेक्षा कमी पटसेख्येच्या इवल्याशा शाळा बंद करण्याच्या पूर्वी एक विचार जरुर केला पाहिजे. त्या शाळा सुरू होण्यापूर्वी त्या ठिकाणची काय अवस्था होती. तिथे शाळा का सुरू करावी लाग-ली. इतके दिवस ते गाव शाळेविना का ठेवले होते? कोणती व्यवस्था शिक्षणावर नियंत्रण ठेवून होती की ज्यामुळे समाज अज्ञानाच्या काळोखात चाचपडत पडलेला होता. शाळा सुरू करण्यासाठी कोणी प्रयत्न केले आणि आता शाळा बंद करण्याचा घाट का घातला जात आहे? ज्यांनी या अज्ञानी समाजाला हजारो वर्षे शिक्षणापासून दूर ठेवले, स्त्री शूद्रातिशूद्रांच्या अध्ययनास बंदी घातली तेच सूत्र शाळा बंद करण्यामागील मनोवृत्तीत दिसेल.

शाळा बंद करण्याचा घोषा चालू असताना शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांच्या दडपणाची चर्चा जाणून-बुजून का दाबली जाते? अनेक शिक्षकांनी समाजमाध्यमातून व्यक्त होत असताना "आम्हाला आमच्या विद्यार्थ्यांना शिकवू द्या' अशी आर्जवी साद शासन-प्रशासनाकडे घालायला सुरुवात केली. पण शिक्षकांची गाऱ्हाणी पाहिजे तशी कुणीही मनावर घेत नाही. शिक्षकांना गलेलठ्ठ वेतन मिळते म्हणून त्याला वाटेल ती यंत्रणा वाटेल ती कर्तव्ये सोपविण्याच्या हौसेत दिसतात. याचा परिणाम शाळा गुणवत्तेवर होणार की नाही? यामुळे शिक्षकांचे मानसशास्त्रीयदृष्टीने पैलू कसे असतील. शिक्षकांची प्रतिभा, क्षमता, कौशल्ये बौद्धिक काम करण्यापेक्षा कारकुनी कामाचे जुगाड जमवण्यात जास्त खर्ची पडत असल्यास नवल काय? शिक्षकांकडे असलेली शे-दिडशे अशैक्षणिक किंवा अध्यापनेतर म्हणता येईल अशा कामांची जंत्री शिक्षक स्मरणात ठेवतील की गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आशय? हे समाजालाही समजू नये? त्याबद्दल बोलू नये?

शिक्षकांचे वेतन वाढले हे खरे आहे. वेतन आयोगानुसार ते वाढते अपरिहार्यता म्हणून. वास्तविकतः वेतन आयोगातील मलाईदार थराचे लाभार्थी वरचे बडे अधिकारी असतात. तेच वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करून घेतात. शिक्षक किंवा चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना शेवटच्या पंक्तीतील लाडवाच्या कटोऱ्यातील उरल-सुरला भुरका मिळावा अशी वस्तुस्थिती असते. पण जो-तो शिक्षकांच्या पगारावर आकडेमोड, ठोकताळे करत बसतात.

खरं तर शिक्षकांच्या जीवावर शाळा टिकून आहेत. अनेक प्रकारची कामं करुन ही शिक्षक शाळा टिकवण्याचे कसबी काम करत असताना शिक्षकालाच टार्गेट केले की शिक्षणाचा कणाच मोडला जाईल. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा कणा असलेला शिक्षक मोडकळीस आला की शिक्षणाचं वाटोळ करता येईल.

शाळाबंदीमुळे शिक्षकाची नोकरी जाईल म्हणजे मास्तरची चांगली जिरेल असा खोडसाळ घातकी प्रचार लोक समर्थनार्थ केला जाईलच. पण हंटर आयोगाला जोतीरावांनी दिलेल्या निवेदनापासून शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी झा-लेली सुरुवात, शाहू महाराजांनी सक्तीच्या व मोफत शिक्षणासाठी समाजाला घातलेली गळ, कर्वे, शिंदे, भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख, बाबासाहेब आंबेडकर ह्यांचा शिक्षणासाठी संघर्ष, संवैधानिक तरतुदीतून गाव तिथे शाळा, एक शिक्षकीच्या द्वीशिक्षकी शाळा, खडू-फळा योजनेंतर्गत शिक्षकांची पूर्तता, वस्तीशाळा, सेतूशाळा, साखरशाळा, यासारखे शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी प्रभावी कार्य किती महत्त्वाचे नि ऐतिहासिक आहेत. हे सगळं विसरुन शिक्षणावरील खर्चातील महत्तम भाग वेतनावर खर्च होतो. या सबबीखाली शाळा बंद करुन शिक्षकांची जिरवणं व शाळांची वाट लावणं हे कोणत्या शहाजोगपणाचं नियोजन आहे. त्यांना समाजाने शिक्षणद्रोष्टे, समाजद्रोही, राष्ट्रद्रोही की काय म्हणावे? कारण शिक्षणातून जर राष्ट्र बलशाली होत असतात हे शिक्षण तज्ज्ञांनी सांगितलेले विचार यथार्थ असतील, तर शाळा बंदीचे कर्म बलशाली राष्ट्रानिर्मितीस खीळ बसणारे ठरेल! आणि कर्माचा कर्ता राष्ट्रद्रोही!!

अनुज हुलके

# धान घोटाळ्यात उपप्रादेशिक व्यवस्थापक मुळेवार निलंबित

**गोंदिया:-** जिल्ह्यात धान घोटाळ्याचा पहिला बळी गेला असून जिल्ह्याच्या आलेवाडा व गोरे धान खरेदीत व भरडाईमध्ये अनियमितता केल्याप्रकरणी देवरी उपप्रादेशिक व्यवस्थापक आशिष मुळेवार यांना महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी निलंबित केले आहे.

आशिष मुळेवार यांनी २ कोटी ७२ लाख ६४ हजार ८१ रुपयांच्या धानाचा अपहार केल्याचे सिद्ध झाले आहे. याशिवाय त्यांच्यावर धान साठा शिल्लक नसणाऱ्या संस्थेवर कारवाई न करणे, अपहार करणे, तसेच चौकशी अधिकाऱ्यांवर दबाव टाकणे आणि शासनाचे नुकसान करणे आदी आरोप सिद्ध झाले आहेत. जिल्ह्यात पणन महामंडळ व आदिवासी भागात आदिवासी विकास महामंडळाद्वारे धान खरेदी केली जाते. यासाठी हे विभाग धान खरेदी केंद्राला मान्यता देऊन धान खरेदी करण्यात येतो.आदिवासी विकास महामंडळ उपप्रादेशिक कार्यालय देवरी यांच्याकडून हंगाम २०२०-२१ मध्ये खरेदी केंद्र आलेवाडा व हंगाम २०२१-२२ मध्ये खरेदी केन्द्र गोरे यांना धान खरेदीचा अधिकार देण्यात आला होता. मात्र दोन्ही केंद्रांनी केवळ कागदावर खरेदी दाखवत शासनाला कोट्यवधी रुपयांचा चुना लावला आहे. यात हंगाम २०२०-२१ मध्ये खरेदी केंद्र आलेवाडा येथे ९० लाख ५५ हजार ७८४ रुपयांचा ४ हजार ८४७.८५ क्विंटल धानाचा साठा तर हंगाम २०२१-२२ मध्ये खरेदी केन्द्र गोरे येथे १ कोटी ८२ लाख



८ हजार २९७ रुपयांच्या ९ हजार ३८५.७२ धानाचा साठा असा दोन्ही केंद्रांवर एकूण २ कोटी ७२ लाख ६४ हजार ८१ रुपयांच्या धान घोटाळा करण्यात आला आहे.

प्रादेशिक व्यवस्थापन भंडारा यांनी दोन्ही केंद्रावरील धानाच्या भरडाईसाठी राइस मिलर यांना डिओ दिले असता या दोन्ही केंद्रांवर धान आढळला नाही. यांची तक्रार झाल्यावर व्यवस्थापकीय संचालक यांच्याद्वारे झालेल्या चौकशीत भ्रष्ट अधिकारी आशिष मुळेवार यांनी धान साठा शिल्लक नसणाऱ्या संस्थेवर कारवाई न करणे, अपहार करणे, तसेच चौकशी अधिकाऱ्यांवर दबाव टाकणे आणि शासनाचे नुकसान करणे आदी दोष सिद्ध करण्यात आल्याने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे त्यांच्या या कामात मदत करणाऱ्या त्यांच्यासह तत्कालीन विपणन निरीक्षक एम.एस. इंगळे, प्रतवारीकार व विपणन निरीक्षक सी. डी. जुगनाके या तिघांवर फौजदारी गुन्हे नोंदवण्यात येणार आहेत. त्यामुळे गोंदिया जिल्ह्यात घोटाळ्यात वर्ग १ च्या अधिकाऱ्यावर कारवाई झाल्याने इतर भ्रष्ट अधिकाऱ्यांचे दाबे दणाणले आहे. त्यामुळे गोंदिया जिल्ह्यातील धान घोटाळ्यात अजून किती अधिकारी अडकतात, हे बघणे महत्वाचे ठरणार आहे.

दुसरीकडे यावर्षी पणन महामंडळाद्वारे खरेदी करण्यात आलेल्या रब्बी हंगामादरम्यान घोळ करणाऱ्या ३८ धान खरेदी केंद्रांना जिल्हा मार्केटिंग फेडरेशनने प्रत्येकी १ लाख रुपयांचा दंड ठोठावीत तो ३० सप्टेंबरपर्यंत भरण्याची नोटीस बजाविली होती. दरम्यान ३८ पैकी १६ केंद्रांनी दंडाची रक्कम भरली तर काही केंद्रांनी त्यांच्या कमिशनमधून दंडाची रक्कम कपात करण्याचे पत्र दिले आहे. तर १२ केंद्रांनी कुठलाच प्रतिसाद न दिल्याने या धान खरेदी केंद्रांचे धान खरेदीचे अधिकार गोठविण्यात येणार आहेत. यापुढे त्यांना धान खरेदी करता येणार नाही.

# १० लाखांचे बक्षीस असलेल्या दोन जहाल नक्षल्यांना अटक; गडचिरोली पोलिसांची कारवाई

**गडचिरोली:-** धानोरा तालुक्यातील सावरगाव पोलीस मदत केंद्रांतर्गत गडचिरोली पोलिसांनी राबवलेल्या नक्षलविरोधी अभियानादरम्यान दहा लाखांचे बक्षीस असलेल्या दोन जहाल नक्षल्यांना अटक करण्यात पोलिसांना यश आले. सनिराम ऊर्फ शंकर ऊर्फ कृष्णा श्यामलाल नरोटे (२४), समुराम ऊर्फ सूर्या घसेन नरोटे (२२) असे अटक केलेल्या नक्षल्यांची नावे असून दोघेही धानोरा तालुक्यातील मोरचुल येथील रहिवासी आहेत, अशी माहिती गडचिरोली पोलिसांनी पत्रपरिषदेत दिली.

उपविभाग धानोरा अंतर्गत येणाऱ्या सावरगाव पोलीस मदत केंद्र हद्दीत ७ ऑक्टोबर रोजी गडचिरोली पोलीस दलाकडून गुप्त माहितीच्या आधारे राबवण्यात आलेल्या नक्षलविरोधी




अभियानादरम्यान दोन संशयीत व्यक्ती आढळून आले होते. त्यांची सखोल चौकशी केली असता ते नक्षली असल्याची खात्री पटली. यानंतर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले.

यापैकी सनिराम हा ऑक्टोबर २०१५ साली टिपागड दलममध्ये दाखल झाला होता. जहाल नक्षली नेता जोगन्नाचा अंगरक्षक म्हणून २०१८ पर्यंत तो कार्यरत होता. त्यानंतर ऑगस्ट २०१८ ते २०२० पर्यंत कंपनी १० मध्ये कार्यरत होता.

सध्या तो पीपीसीएम म्हणून कंपनी १० मध्ये कार्यरत होता. त्याच्यावर ८ लक्षांचे बक्षीस होते, तर समुराम ऊर्फ सुर्या हा जन मिलिशिया सदस्य म्हणून कार्यरत होता. त्याच्यावर २ लाख रुपयांचे बक्षीस होते. दोन्ही नक्षल्यांचा हत्या, जाळपोळ, चकमक, अशा अनेक गुन्ह्यांमध्ये सहभाग असल्याची माहिती पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांनी दिली.

# उद्योजक बनून आत्मनिर्भर व्हा-आ.चंद्रिकापुरे



**अर्जुनी मोरगाव:-** घराबाहेर पडून उद्योजक व्हा.घराला हातभार लागेल.जीवनमान उंचावून कुटुंब सुखी होईल. उद्योग उभारणीमुळे वस्तू गावातच उपलब्ध होतील. संघर्ष केल्याशिवाय काहीच साध्य होत नाही.समर्पणाची भावना असली पाहिजे. सामुदायिक जाणिवेची जबाबदारी स्वीकारा.कामाला लागा. यशप्राप्ती निश्चितच होईल असे प्रतिपादन आ मनोहर चंद्रिकापुरे यांनी केले.

ते खादी व ग्रामोद्योग आयोग नागपूर तसेच आ मनोहर चंद्रिकापुरे यांचे संयुक्त विद्यमाने शनिवारी स्थानिक प्रसन्न सभागृहात आयोजित प्रधानमंत्री रोजगार सृजन कार्यक्रम अंतर्गत जनजागृती मेळाव्यात बोलत होते. यावेळी नगराध्यक्ष मंजुषा बारसागडे, नागपूर खादी व ग्रामोद्योग आयोगाचे निदेशक राघवेंद्र महिंद्रकर, सहनिदेशक आर एम खोडके,पं स सदस्य पुष्पलता द्रुगकर, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष लोकपाल गहाणे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासक उद्धव मेहंदळे, प्रमोद लांजेवार, खादी ग्रामोद्योगचे कनिष्ठ कार्यकारी भावेश शहारे, विजय शहारे, उमेदचे तालुका अभियान व्यवस्थापक रेशीम नेवारे उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, ग्रामीण भागात उद्योगाचे जाळे विस्तीर्ण झाल्यास उत्पादित वस्तू गावातच मिळू लागतील.१०० बचतगटांनी पुढे यावे आपण त्यांना एक कोटींवरील प्रकल्प उभे करण्यासाठी सहकार्य करूयासाठी बचतगट सक्षम असले पाहिजे. ग्रामीण भागात चर्चा, संवाद व मार्गदर्शनाच्या अभावामुळे उद्योगधंद्यांना चालना मिळत नसल्याचे ते म्हणाले.

महिंद्रकर म्हणाले, ग्रामिणांना रोजगार उपलब्ध करुन देणे हा या कार्यक्रमाच्या आयोजनामागील मुख्य हेतू आहे.हा परिसर जंगलाने व्यापलेला आहे. येथे शेती, मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध आहे. येथे उद्योगाला बराच वाव आहे. डोक्याच्या मेंदूला चालना द्या.योग्य उद्योगधंद्यांची निवड करा.उद्योजक बना.आपण सहकार्य करू असे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन मंजुषा चंद्रिकापुरे यांनी केले.उपस्थितांचे आभार उद्धव मेहंदळे यांनी मानले.

# पालकमंत्री मुनगंटीवारांचे कोहमारा येथे स्वागत



**सडक अर्जुनी:-** राज्यात भाजप-शिवसेना (शिंदे गट) चे सरकार स्थापन झाले. दरम्यान नुकतेच सरकारच्या वतीने जिल्ह्याच्या पालकत्वाची जबाबदारी सोपविण्यात आले. राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री झाले. त्याचे (ता.१०) प्रथमच गोंदिया जिल्ह्यात आगमन झाले. त्यांच्या आगमनामुळे सडक अर्जुनी येथे माजी मंत्री राजकुमार बडोले यांच्या नेतृत्वात भाजप पदाधिकाऱ्यांनी ना.मुनगंटीवार यांचे जल्लोषात स्वागत केले.

गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे सडक अर्जुनी येथे आगमन झाले. माजी मंत्री इंजि.राजकुमार बडोले यांनी (ता.१०) भाजप कार्यालय सडक अर्जुनी येथे उत्स्फुर्त स्वागत करत सत्कार केला. व विविध मागण्यांचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना निवेदन दिले.

याप्रसंगी खासदार अशोक नेते, विदर्भ संघटन मंत्री उपेंद्र कोठेकर, सडक अर्जुनीचे तालुकाध्यक्ष अशोक लंजे, पं.स. सभापती संगीता खोब्रागडे, उपसभापती शालिंदर कापगते, माजी जि.प. उपाध्यक्ष रचना गहाने, उमाकांत ढेंगे, रंजना भोई, शीतल गौर, जि.प.सदस्य डॉ.भुमेश्वर पटले, जि.प.सदस्य कविता रंगारी, निशा तोडासे, पं.स.सदस्य चेतन वडगाये, वर्षा शहारे, जिल्हा भाजप महामंत्री हर्ष मोदी, शेषराव गिरेपूंजे, लक्ष्मीकांत धांनगाये, छाया चव्हाण, गौरेश बावनकर, विनोद बार सागडे, ललित डोंगरवार, शुभम जनबंधू, चरण शहारे, यांच्यासह अजुनी-मोर विधानसभा क्षेत्रातील भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन १२ नोव्हेंबरला

**गोंदिया**-राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, दिल्ली यांचे निर्देशान्वये व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे मार्गदर्शनाप्रमाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, गोंदिया यांचे मार्फत जिल्हा न्यायालय, गोंदिया, कामगार न्यायालय, जिल्हा ग्राहक तकार निवारण आयोग गोंदिया, तसेच जिल्हयातील तालुका विधी सेवा समित्यामार्फत सर्व तालुका न्यायालयामध्ये १२ नोव्हेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.न्यायालयात दाखल असलेली तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, एन. आय. ॲक्ट कलम १३८, बॅक रिकव्हरीची प्रकरणे, वैवाहिक / कौटुंबिक वाद, कामगार,भु-संपादन ,दिवाणी,भाडे, बॅक वसुली, कर्ज वसुली,विद्युत व पाणी बीलाची इत्यादी तसेच सर्वच प्रकारची तडजोडपात्र दाखल तसेच दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. प्रकरणे सामंजस्याने मिटविण्याकरीता न्यायाधीश, तज्ञ वकील व सामाजिक कार्यकर्ते यांचे पॅनल मदत करणार आहे.

# दीर्घ मुदतीच्या धानासाठी धापेवाडाचे पाणी सोडा



**तिरोडा :** यंदा समाधानकारक पाऊस पडला असला तरी आजघडीला दीर्घ मुदतीच्या धानाला पाण्याची गरज पडत आहे. खरीप हंगामातील दीर्घ मुदतीचे धान एका पाण्यासाठी अडचणीत आले आहेत. याकरीता शेतकरी आटापिटा करीत आहेत. करीता धापेवाडा उपसा सिंचनाचे पाणी त्वरित सोडण्यात यावे, अन्यथा शेतकऱ्यांसह रस्त्यावर उतरू अशा मागणीचे निवेदन कवलेवाडा क्षेत्राचे जि.प.सदस्य किरणकुमार पारधी यांनी दिले आहे.

यावर्षी जिल्ह्यात समाधानकारक पावसाची नोंद झाली आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात पावसाचा लहरीपणा जाणवत आहे. यामुळे तिरोडा तालुक्यातील कवलेवाडा, मरारटोला, चिरेखनी, बेलाटी, मांडवी, घाटकुरोडा यासह अनेक गावातील दीर्घ मुदतीचे धान सिंचनाअभावी धोक्यात आले आहेत. करीता धापेवाडा उपसा सिंचनाचे पाणी त्वरित सोडून संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यात यावा, अन्यथा शेतकऱ्यांसह रस्त्यावर उतरुन तीव्र आंदोलन करणार, असा इशारा जि.प.सदस्य किरणकुमार पारधी यांनी निवेदनाच्या माध्यमातून दिला आहे.

# सुरेवाडा उपसा सिंचन प्रकल्पाला मंजुरी;५ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार

**भंडारा :-** जिल्ह्यातील महत्त्वाकांक्षी सुरेवाडा उपसा सिंचन प्रकल्पाच्या सुधारित ३३६ कोटींच्या प्रस्तावास २०१६ रोजी राज्याच्या वन, पर्यावरण तसेच अन्य समित्यांची मान्यता मिळाली होती. मात्र, प्रकल्पाचे काम सुरू होण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाच्या मंजुरीची प्रतीक्षा होती. गेल्या तीन वर्षांपासून मंजुरी न मिळाल्याने प्रकल्पाचे काम कासवगतीने सुरू होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षते खाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या योजनेस गती देण्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला.

एकूण ३३६ कोटी २२ लाख इतक्या सुधारित खर्चास मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामुळे भंडारा जिल्ह्यातील २७ व गोंदिया जिल्ह्यातील १ अशा २८ गावांतील ५ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. सुरेवाडा गावाजवळ वैनगंगा नदीच्या डाव्या तिरावर हा प्रकल्प बांधण्यात येत असून यासाठी ३८.६२५ दलघमी पाणी उपलब्ध आहे. मोहाडी व तिरोडा तालुक्यातील २८ गावांतील पाच हजार



हेक्टर क्षेत्र सिंचनापासून वंचित आहे. वैनगंगा नदीवर तयार होत असलेल्या सुरेवाडा उपसा सिंचन प्रकल्पास २००६ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. २००९ मध्ये प्रकल्पाच्या बांधकामासाठी थोडी फार कामे करण्यात आली. २०१६ मध्ये प्रकल्पाच्या मुख्य अडचणी दूर झाल्या. प्रकल्पासाठी वनविभाग, कोका वन्यजीव अभयारण्य, पर्यावरण मंत्रालय, राज्य तांत्रिक सल्लागार समिती नाशिक, त्रिसदस्यीय समिती व राज्य नियामक मंडळाने मान्यता प्रदान केली. वनविभागाने पुढचे पाऊल टाकत कालव्यांचे बांधकाम व अन्य कामांसाठी जागेची अडचण दूर करुन वनजमीन उपलब्ध करुन दिली. प्रकल्प पूर्णत्वाच्या बऱ्याच अडचणी दूर झाल्या. मात्र गरज होती ती राज्य मंत्रिमंडळाच्या परवानगीची. ऑक्टोंबर २०१९ रोजी गोसेखुर्द उपसा सिंचन विभाग आंबाडी (भंडारा) यांनी प्रकल्पाचा प्रस्ताव राज्य मंत्रिमंडळाकडे मान्यतेसाठी पाठविला. तीन वर्षांचा कालावधी लोटूनही परवानगी मिळाली नाही. त्यामुळे प्रकल्पाचे उर्वरित कामे संथ गतीने सुरू होती. २०१९ मध्ये प्रकल्पाला मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली असती तर आतापर्यंत प्रकल्पाचे बरेच काम पूर्ण झाले असते. शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पोहोचण्याचा मार्ग प्रशस्त झाला असता.

### सुधारित मान्यतेची गरज का?

**२००६ मध्ये सुरेवाडा उपसा सिंचन योजनेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यावेळी प्रकल्पाची मूळ किंमत ६८.५८ कोटी रुपये होती. आज दीड दशकानंतर प्रकल्पाच्या किंमतीत वाढ होऊन पूर्णत्वाचा खर्च ३३६.२२ कोटी रुपयांवर पोहोचला आहे.**

### तर दोन वर्षात काम पूर्ण करू

**सुरेवाडा उपसा सिंचन योजना महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. आतापर्यंत मिळालेल्या निधीतून वैनगंगा नदीवर पंप हाऊसचे बांधकाम तसेच रायसिंग मेनचे काम सुरू आहे. विभागाने सर्व प्रकारच्या मंजूऱ्या मिळवल्या होत्या. राज्य मंत्रिमंडळाने सुधारित प्रस्तावास आज मान्यता दिल्याने या कामाला गती येणार असून नियमित निधी मिळाल्यास २०२४ पर्यंत प्रकल्प पूर्ण करुन तीन तालुक्यांतील २८ गावांतील पाच हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणता येईल.**

**अ.वी.फरकडे,** कार्यकारी अभियंता गोसेखुर्द उपसा- सिंचन विभाग, आंबाडी (भंडारा)

### सिंचनाचा प्रश्न मार्गी लागणार

**प्रकल्पाबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जलसंपदामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी पत्रव्यवहार केला होता. उपमुख्य सचिव भूषण गगराणी यांच्याकडेही मागणी केली होती. सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रकल्पाला ३३६.२२ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. या मान्यतेमुळे प्रकल्प क्षेत्रात येणाऱ्या गावातील सिंचनाचा प्रश्न मार्गी लागणार आहे.**

**सुनील मेंढे, खासदार**

# हत्तींच्या हैदोसाने धानपीक भुईसपाट

**नवेगावबांध :-** या वनपरिक्षेत्रअंतर्गत कवठा वनक्षेत्रालगत शेतशिवारात हत्तींच्या कळपाने मोठ्या प्रमाणात धानपिकाचे नुकसान केले असून शेतकरी मेटाकुटीला आलेला आहे. हत्तींच्या शेतातील वावरामुळे धानपीक भुईसपाट झाले असून हाती आलेले पीक गमविण्याची वेळ शेतकऱ्यांवर आल्याने चिंतेचे वातावरण आहे.

अर्जुनी मोरगाव तालुक्यातील कवठा शेत शिवारात शुक्रवार (दि. ७) रात्री आठ वाजताच्या दरम्यान हत्तींच्या कळपाने मोठ्या प्रमाणात धानपिकाचे नुकसान केले. मागील दहा ते बारा दिवसांपासून हत्तींच्या कळपाचा मुक्काम याच परिसरात असून हत्तींकडून धानपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले जात आहे.

जीवाच्या भीतीने अनेक शेतकऱ्यांनी शेतावर जाणेसुद्धा बंद केले आहे. शुक्रवारी हत्तींनी या परिसरातील शेतांमध्ये चांगलाच धुमाकूळ घातल्याने पिकांची मोठ्या प्रमाणात नासधूस झाली आहे.ऋषी काशीराम बहेकार, सिताराम कवडू मेंढे, नरेंद्र खुशाल मेश्राम, गजानन खुशाल मेश्राम, बंडू रामटेके, देवदास चिमणकर, मारुती सावुस्कार या शेतकऱ्यांच्या धान पिकाचे मोठ्या प्रमाणावर हत्तींच्या कळपाने नुकसान केले आहे.

कवठा परिसरात तसेच बोडदा परिसरात या हत्तींच्या कळपाची धास्ती शेतकऱ्यांनी घेतलेली आहे. रात्रीच्या वेळी हत्तींचा कळप गावांमध्ये येऊन जीवितहानी व वित्तहानी करणार तर नाही ना, या दहशतीत शेतकरी वावरत आहेत. वन विभागाने हत्तींचा बंदोबस्त करावा अशी मागणी परिसरातील शेतकरी करीत आहेत.

### नुकसानग्रस्तांना शासकीय निकषाच्या चारपट मदत द्या

**हत्तींच्या कळपाकडून धानपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले जात आहे. यामुळे शेतकऱ्यांना हाती आलेले पीक गमाविण्याची वेळ आली आहे. वनविभागाकडून नुकसानीची मिळणारी भरपाई ही फारच अल्प आहे. त्यामुळे शासनाने यात बदल करून हेक्टरी मिळणारी मदत वाढवून द्यावी. आता निकषाप्रमाणे एका हेक्टरला २५ हजार रुपयापर्यंत किंवा एका शेतकऱ्याला जास्तीत जास्त २५ हजारापर्यंतची नुकसानभरपाई दिली जाते. ती ग्राह्य न धरता यात तीन ते चार पटीने वाढ करुन शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. शेताच्या चारही बाजूला उपाययोजना म्हणून जाळीचे व तारांचे कुंपण देण्याची व्यवस्था वनविभागाने करण्याची मागणी होत आहे.**

# शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीसाठी नोंदणी करा-अपर जिल्हाधिकारी खवले



**गोंदिया:-** नागपूर विभाग शिक्षक मतदार संघ निवडणूक २०२३ साठी एक आक्टोंबर पासून मतदार नोंदणी प्रक्रीया सुरू झाली असून पात्र शिक्षकांनी निवडणूक आयोगाने जारी केलेला फार्म १९ भरून मतदार व्हावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी राजेश खवले यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहामध्ये आज झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. निवासी उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबरीश मोहबे व नायब तहसीलदार आप्पासाहेब वलखेडे उपस्थित होते. ०१ ऑक्टोबर २०२२ पासून मतदार नोंदणी जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. सोबतच नागपूर विभाग शिक्षक मतदार संघ निवडणूक २०२३ साठी निवडणूक प्रक्रियेला सुरुवात होणार आहे.

२५ ऑक्टोबरला दुसरी व अंतीम सूचना प्रसारित झाल्यानंतर ०७ नोव्हेंबरपर्यंत दावे व हरकती स्वीकारण्याचा अंतिम दिनांक आहे. प्रारुप मतदार यादी २३ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. दावे व हरकती निकाली काढण्याचा दिनांक २५ डिसेंबर २०२२ आहे. मतदार यादीची अंतिम प्रसिद्धी ३० डिसेंबर २०२२ रोजी होणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये एक ऑक्टोबर २०२२ पासून तर ९ डिसेंबर २०२२ पर्यंत दोन टप्प्यांमध्ये आपल्या नावाची नोंदणी करण्याची संधी मतदारांना मिळणार आहे. यासाठी निवडणूक विभागाचा नमुना १९ भरणे अनिवार्य आहे.

### कोण करू शकतो मतदान

**गोंदिया जिल्ह्यातील माध्यमिक व त्यावरील शैक्षणिक संस्थांमध्ये ०१ नोव्हेंबर २०१६ ते ०१ नोव्हेंबर २०२२ या सहा वर्षाच्या कालावधीत सलग किंवा टप्प्याटप्प्याने किमान तीन वर्ष शिक्षक म्हणून सेवा केलेले शिक्षकच यासाठी पात्र मतदार असणार आहेत. शैक्षणिक कार्य केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक असणार आहे. सोबतच निवडणूक आयोगाचा फॉर्म १९ भरणे प्रत्येकाला अनिवार्य आहे. शिक्षक मतदार संघ निवडणुकीसाठी प्रत्येक निवडणुकीला नव्याने मतदार यादी तयार होते, यासाठी दरवेळी नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे. नोंदणीकृत मतदारालाच मतदान करण्याचा हक्क आहे. या नोंदणीसाठी प्रत्येक तालुक्याला सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी म्हणून तहसिलदार व उपविभागीय अधिकारी पदनिर्देशीत अधिकारी म्हणून काम करतील.**

### मतदार ओळखपत्र-आधार जोडणी

**जिल्ह्यात एकूण चार विधानसभा क्षेत्र असून एकूण मतदारांची संख्या १० लाख ९५ हजार १८६ आहे. यापैकी ०५ लाख ८५ हजार८८९ मतदारांची मतदार ओळखपत्र आधारशी जोडणी झाली आहेत. जिल्ह्यात आधार जोडणी ५३.५० टक्के झाली असून आधार जोडणीचे काम वेगाने सुरू आहे.**


# महाराष्ट्र शासन
# कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रं.२ गोंदिया
## (दुरध्वनी क्र.०७१८२-२५००८४)

## ई-निविदा सुचना क्रमांक २६/२०२२-२३

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, क्रं.२ गोंदिया हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक खात्याकडून सुशिक्षीत बेरोजगार अभियंता करीता फक्त खालील कामाकरीता विहीत ब-१ (टक्केवारी पद्धतीने) नमून्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (औनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रं.२ गोंदिया यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजीत रक्कम (रू.लक्षात) | इसारा रक्कम (रू.लक्षात) | ई-निविदा फार्म किंमत (नापरतावा) |
|---|---|---|---|---|
| १ | मौजा देवरी ता.देवरी जि.गोंदिया येथे तलाठी साझा क्रं.८ येथे तलाठी कार्यालयाचे बांधकाम करणे. | २९.६७ | ०.०० | ५६०.०० |
| २ | मौजा सावंगी ता.सडक/अर्जुनी जि.गोंदिया भुमापन क्रं.१४ येथे तलाठी कार्यालयाचे बांधकाम करणे. | २९.६७ | ०.०० | ५६०.०० |
| ३ | मौजा बोंडगांव/देवी ता.अर्जुनी/मोर जि.गोंदिया गट क्रं.५६८ येथे तलाठी कार्यालयाचे बांधकाम करणे. | २९.६७ | ०.०० | ५६०.०० |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी :-** per e-tender Schedule uploaded on e-portal

ई-निविदा उघडणे :- ऑनलाईन नमुद केल्यानुसार वेळापत्रक रक्कम स्थळ इ.लागू व अंतिम राहील.

**टीप :-**

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध राहील.

१. http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

२. कार्यकारी अभियंता सां.बां.विभाग क्रं. २ गोंदिया कार्यालयातील सुचना फलक.

३. सदर निविदा सुचनेतील कामासंबंधात कोणताही बदल हा वृत्तपत्रात प्रकाशित केल्या जाणार नाही. निविदा सुचनेतील कामासंबंधात कोणताही बदल फक्त http://mahatenders.gov.in या साईटवरच प्रकाशित केल्या जाईल.

**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं.२ गोंदिया**

क्र.संमावज/नाग/४८२/२०२२

# धानाला बोनस,महागाई विरोधात राष्ट्रवादीचे आंदोलन,मुख्यमंत्र्यांना निवेदन




**गोंदिया:–** धानाला १ हजार रुपये सानुग्रह अनुदान जाहीर करावा, महागाई कमी करावी, शेतकरी, शेतमजुरांच्या समस्यांचे निराकरण करावे आदी विविध मागण्यांना घेऊन सोमवार १० ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पाटीतर्फे धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना पाठविण्यात आले.

वेदांता ग्रुपचा उद्योग परत महाराष्ट्रात आणावा, शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल १००० रुपये बोनस द्यावा, धान खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी त्वरित सुरू करण्यात यावी, नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन अनुदान देण्यात यावे, संजय गांधी निराधार, श्रावणबाळसह इतर अर्थसहाय्य योजनांचे अनुदान त्वरित देण्यात यावे, रिडींगनुसारच वीजबिल देण्यात यावे, अतिक्रमणधारकांना जमिनीचे पट्टे त्वरित देण्यात यावे, ज्या शेतकऱ्यांना पट्टे मिळाले आहेत त्या शेतकऱ्यांचा सातबारा वर पिक नोंदणी करावी, वन्य प्राण्यांच्या हल्ल्यातील मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसांना तात्काळ आर्थिक मदत द्यावी तसेच अतिवृष्वृटी व वन्यप्राण्यांमुळे झालेल्या पीक नुकसानीचा, अतिवृष्वृटीमुळे घर व गोठ्यांचा नुकसानीचा त्वरित मोबदला देण्यात यावा, बेघर झालेल्या कुटूंबाना त्वरित घरकूल योजनेचा लाभ देण्यात यावा, इंधनाचे दर नियंत्रणात आणावे, किटकनाशक, रसायनिक खत, बियाणांचे दर नियंत्रणात आणावे, महागाई कमी करावी आधी अनेक मागण्यांना घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर राष्ट्रवादींच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी धरणे दिली.

यावेळी सभेत अनेक पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त केले यानंतर जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मागण्याचे निवेदन पाठविण्यात आले. यावेळी माजी आमदार राजेंद्र जैन, आ. मनोहर चंद्रिकापुरे, आ.राजु कारेमोरे, जिल्हाध्यक्ष परशुरामकर, अॅड.विरेंद्र जायस्वाल, रविकांत बोपचे, नरेश माहेश्वरी, विनोद हरिनखेड़े, रमेश ताराम, राजलक्ष्मी तुरकर, यशवंत गणवीर, पूजा अखिलेश सेठ, बालकृष्ण पटले, कुंदन कटारे, मोहन पटले, केतन तुरकर, अजय उमाटे, सी.के.बिसेन, लोकपाल गहाणे, डॉ अविनाश काशीवार, केवल बघेले, सुरेश हर्षे, जगदीश बावनथडे, किरण पारधी, नेहा तुरकर, सुधा रहांगडाले, अश्विनी पटले, रिता लांजेवार, योगेंद्र भगत, प्रेमकुमार राहगडाले, कमलबापू बहेकार, मनोज डोंगरे, प्रभाकर दोनोडे, किशोर तरोणे, रफिक खान, कल्पना बहेकार, रजनी गिऱ्हेपुंजे, गणेश बरडे, अखिलेश सेठ, तेजराम मडावी, नीरज उपवंशी, सुनील पटले आदींसह बहुसंख्येने राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी बांधव उपस्थित होते.

### गावस्तरापासून आंदोलन उभे करू: माजी आमदार राजेंद्र जैन

आघाडी सरकारच्या काळात भाजपचे पदाधिकारी १००० रुपए बोनसची मागणी करीत होते. आज त्याच मागणी बरोबर जनविरोधी धोरणांना घेवून राष्ट्रवादी कॉंग्रेस आंदोलन करीत आहे. मात्र शेतकऱ्यांच्या हित जोपासण्याचा देखावा करणाऱ्या सरकारच्या प्रतिनिधीने या मंडपाला भेट देण्याचे औदार्य दाखविले नाही. ही एक शोकांतिका आहे. किंबहुना यावरुनच भाजप शेतकरी हितेशी आहे की नाही, हे देखील सिध्द होत आहे. आज ज्या मागण्यांना घेवून राष्ट्रवादी कॉंग्रेस आंदोलन करीत आहे. त्या मागण्या राज्य सरकारने पुर्ण करावे, अन्यथा खा.प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वात गावस्तरावरून याहून अधिक तीव्र आंदोलन उभे करू, असा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते तथा माजी आमदार राजेंद्र जैन यांनी दिला

### भाजप प्रणीत सरकारचे धोरण : आ. मनोहर चंद्रिकापुरे

सत्तेत नाहीत तर नको त्या मागण्या करणे आणि त्या माध्यमातून सर्व सामान्य माणसाची दिशाभूल करणे,मात्र सत्ते आले तर जनतेला दिलेल्या आश्वसन देखील पडायचे नाही या भूमिकेचे परिचय भाजप सरकार आज देत आहे. शेतकऱ्यांना बोनस देण्याचे काम आघाडी सरकार ने केले आहे. ५०० आणि त्याहून अधिक ७०० रुपये आघाडी सरकारांनी दिले आहे. म्हणजे जेव्हा जेव्हा शेतकरी व सर्वसामान्य नागरिक अडचणीत सापडला तेव्हा तेव्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पाटी खंबीर पणे उभी राहिली आहे त्यातूनच हे आंदोलन उभे झाले आहे. शेतकऱ्याच्या समस्या सोडविण्यात आले नाही तर याहून तीव्र आंदोलन करेल. अशा इशारा आंदोलनाच्या माध्यमातून आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी दिला आहे.



## "वंदे भारत" रेल्वेगाडीची देखभाल-दुरुस्ती गोंदियात; कोचिंग डेपोसाठी ५० कोटींचा खर्च



**गोंदिया :** "वंदे भारत" या हायस्पीड रेल्वे गाडीची देखभाल–दुरुस्ती वेगवेगळ्या ठिकाणी करण्याचे नियोजन रेल्वे विभागाने केले आहे. गोंदिया आणि बिलासपूर येथे या गाड्यांची देखभाल–दुरुस्ती केली जाणार असून यासाठी स्वतंत्र डेपो तयार करण्यात येणार आहे. यात केवळ "वंदे भारत" रेल्वे गाड्यांचीच देखभाल–दुरुस्ती केली जाणार आहे. यामुळे गोंदिया रेल्वे स्थानकाचे महत्त्व वाढणार आहे.

"वंदे भारत" या हायस्पीड रेल्वेची नुकतीच सुरुवात करण्यात आली. या रेल्वेचे वैशिष्ट्य म्हणजे ती ताशी १६० ते १८० किमी वेगाने धावते. त्यासाठी या गाडीत काही तांत्रिक बदल करण्यात आले आहेत. गाडीतील बैठक व्यवस्थासुद्धा थोडी वेगळी आहे. टप्प्याटप्प्याने या रेल्वे गाड्या विविध मार्गावर सुरू करण्यात येणार आहेत. या गाड्यांची देखभाल–दुरुस्ती करण्यासाठी गोंदिया आणि बिलासपूर या दोन ठिकाणांची निवड करण्यात आली आहे.

या गाड्यांचे डेपो हे स्वतंत्र असणार असून त्यासाठी प्रत्येकी ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. दोन्ही ठिकाणी कामाला सुरुवात करण्यात आली आहे. पुढील वर्षी मे–जून महिन्यात या डेपोचे काम पूर्ण केले जाईल. त्यानंतर पहिल्या टप्प्यात गोंदिया–दुर्ग तसेच दुर्गवरुन रायपूर मार्गे बिलासपूरवरून झारसगुडा येथे जाईल. तर दुसरी गाडी बिलासपूरहून संपर्क क्रांतीमार्गे दिल्ली येथे पोहोचेल.

### मोजक्याच रेल्वे स्थानकांवर थांबे

**रेल्वेच्या सीआरएमएस चमूने दुर्ग ते झारसगुडा या मार्गावर ताशी १३० किमी वेगाने गाडीची ट्रायल घेतली. हे ट्रायल "वंदे भारत" साठी नसले तरी या मार्गावर ही सुरूकरण्यास कुठलीच अडचण नसल्याचे रेल्वेच्या तांत्रिक विभागाचे म्हणणे आहे. त्यामुळे रेल्वे बोर्डाकडून मंजुरी मिळाल्यानंतर पुढील प्रक्रिया सुरूकेली जाणार आहे. विशेष म्हणजे, या गाडीला थांबादेखील काही निवडक रेल्वे स्थानकांवर असणार आहेत.**

### असे आहे पहिल्या टप्प्यातील नियोजन

**पहिल्या टप्प्यात ही रेल्वे बिलासपूरहून संपर्क क्रांतीमार्गे दिल्लीला जाईल. तर दुसरी गाडी गोंदिया–रायपूर–बिलासपूर मार्गे झारसगुडा येथे जाईल. यामुळे या मार्गावरील प्रवाशांना सोयीचे होणार आहे.**

### बिलासपूर ते दिल्ली १४ तासांत

**सध्या बिलासपूर ते दिल्ली हे अंतर गाठण्यासाठी इतर रेल्वेने १८ तास लागतात. मात्र, "वंदे भारत" रेल्वेने हे अंतर १४ तासांत गाठणे शक्य होणार आहे. तर गोंदियाहून "वंदे भारत" गाडी सुरु झाल्यावर रायपूरहून झारसगुडा येथे पोहोचण्यासाठी चार तास लागणार आहेत.**

## फ्लॅगशिप योजनेत गोंदिया राज्यात पहिल्या पाच मध्ये असावा:पालकमंत्री मुनगंटीवार

**गोंदिया,–**केंद्र व राज्य सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या लोककल्याणाच्या १३ योजना महत्वाकांक्षी कार्यक्रमात समाविष्ट आहेत. या योजना राबवितांना अचूक नियोजन, काटेकोर अंमलबजावणी व योग्य आर्थिक विनियोग या त्रिसूत्रीचा प्रत्येक अंमलबजावणी यंत्रणांनी अमल करून फ्लॅगशिप कार्यक्रमात गोंदिया जिल्हा राज्यात पहिल्या पाच जिल्ह्यात असायलाच हवा असे निर्देश पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी प्रशासनाला दिले. आरोग्य, शिक्षण, कृषी, रोजगार निर्मिती व सिंचन या पंचसूत्रीच्या आधारे जिल्हा विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

विकासाच्या योजना राबवितांना लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन नियोजन करावे. कामाची गुणवत्ता कायम टिकवून ठेवावी. प्रत्येक विकास कामाच्या ठिकाणी फलक लावून त्यावर कंत्राटदाराचे नाव व नंबर, काम केव्हा सुरुझाले, कधी संपणार व निधीची तरतूद या विषयी माहिती नमूद करावी, अशा सक्त सूचना त्यांनी केल्या.

जिल्हा नियोजन समितीची सभा मंत्री, वने, सांस्कृतीक कार्य,मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, गोंदिया जिल्हा सुधीर मुनगंटीवार यांचे अध्यक्षतेखाली १० ऑक्टोंबर रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे आयोजित करण्यात आली होती, यावेळी ते बोलत होते.




खासदार सुनील मेंढे, खा. अशोक नेते, जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, आमदार डॉ. परिणय फुके, अभिजित वंजारी,विजय रहांगडाले, विनोद अग्रवाल, मनोहर चंद्रिकापुरे,सहेसराम कोरेटी, जिल्हाधिकारी नयना गुंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील,पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, जिल्हा नियोजन अधिकारी कावेरी नाखले, सहायक आयुक्त समाज कल्याण विनोद मोहतुरे व प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार उपस्थित होते.

जिल्ह्यात यापुढे आरोग्य, शिक्षण, कृषी, रोजगार व सिंचन या पंचसूत्रीनुसार नियोजन करण्यात यावे. प्रत्येक कार्यालय सुंदर व स्वच्छ असायला हवे. प्रत्येक अधिकाऱ्यांनी स्थिर मनाने काम करणे गरजेचे आहे. स्थिर मनाने लोकांच्या प्रगतीचा आलेख उंचावत न्यावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रत्येक विभागाचे आपल्या अखत्यारीत येणाऱ्या योजनांचे समाधान व समस्या यावर आधारित सादरीकरण तयार करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. हे सादरीकरण सूक्ष्म असावे असेही ते म्हणाले. जलसिंचन, एमआयडीसी, परिवहन, मानवविकास, सार्वजनिक बांधकाम, कौशल्य विकास, खनिज विकास निधी, आदिवासी विकास विभागाने पुढील पाच वर्षाचे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

जिल्ह्याला अतिशय उर्जावान व विकासाची सर्व समावेशक दृष्टी असलेले पालकमंत्री लाभले आहेत अशा शब्दात खासदार व आमदारांनी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा गौरव करून त्यांचे अभिनंदन केले. जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. यात प्रामुख्याने अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान, नुकसानग्रस्तांना भरपाई, सेवा पंधरवडा, लम्पि आजार, धान खरेदी– धान भरडाई, कोविड लसीकरण, बूस्टर डोस, सारस संवर्धन, पर्यटन विकास व गृह भेट आपुलकीची या विषयाचा समावेश आहे.

वनविभागाशी संबंधित विविध विभागाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाची एकत्रित यादी तयार करण्यात यावी. याबाबत विशेष बैठक घेऊन प्रस्ताव मार्गी लावण्यात यावेत, असे निर्देश पालकमंत्र्यांनी वन विभागाला दिले. यासोबतच एमआयडीसी संबंधित विषयाची सुद्धा बैठक घेण्यात येणार आहे. महसूल विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या वन हक्क कायद्याचे सातबारा पट्टे व आनंदाचा शिधा दिवाळी भेट किटचे वाटप पालकमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले.

आदिवासी विकास विभागामार्फत लाभार्थ्यांना देण्यात येणार्या विहीर योजनेचा फेर आढावा घेऊन विहीर, वीज जोडणी व विद्युत मोटर अशी एकात्मिक योजना तयार करण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा असा ठराव या बैठकीत घेण्यात आला.

सभेत जिल्हा नियोजन समिती सभा ३० एप्रिल, २०२२ च्या इतिवृत्तास मंजूरी देणे. किर्यवाही मुद्यांचा आढावा घेणे. ०१ एप्रिल २०२३ पासून विविध योजनांकरीता देण्यात आलेल्या प्रशासकिय मान्यतांचे पुनर्विलोकन करून मान्यता देणे. जिल्हा वार्षिक योजना सन २०२२–२३ अंतर्गत नियोजनाचा आढावा घेणे. (सर्वसाधारण योजना, अनुसुचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना, आदिवासी उपयोजना बाहयक्षेत्र) व अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणाऱ्या इतर विषयावर चर्चा करण्यात आली.

## स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव तात्काळ शासनाकडे सादर करा–आ.रहांगडाले

**तिरोडा:–** महाराष्ट्रात शिंदे फडणवीस सरकार स्थापन होताच तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार यांनी विकासकामांवर भर देत गोरेगाव येथे स्वतंत्र पाणीपुरवठा योजना सुरु करण्याकरिता राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे मागणी केली असता विभागाला प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले.



सदर योजना तातडीने सुरु करण्यासाठी तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांनी जिल्हाधीकारीच्या दालनात बैठक बोलाविली. यामध्ये प्रामुख्याने नगर परिषद तिरोडा येथील म.फुले वार्ड येथील अतिक्रमण धारकांना पट्टे वाटप करणे, नगर पंचायत गोरेगाव येथील शास्कीय जागेवर अतिक्रमण धारकांना पट्टे वाटप करणे,श्रीराम पूर पुनर्वसन येथील पट्टे नियमाकुल करणे, नगर पंचायत गोरेगाव येथे पाणीपुरवठा योजनेचे DPR तयार करणे, अनु.जाती व अन्य परंपरागत वननिवासीधारकांना वनहक्क दावे मंजूर करणे, निमगाव आंबेनाला प्रकल्पाचे काम सुरु करण्यासाठी Catchment Treatment Plant तयार करून सुप्रमाकरिता सादर करणे आदी महत्वपूर्ण विषयावर आढावा घेण्यात आले. या बैठकीमध्ये प्रामुख्याने जिल्हाधिकारी नयना गुंडे, उपवनसंरक्षक कुलराजसिंग, मजीप्राचे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठाचे कार्यकारी अभियंता, तिरोडा व गोरेगावचे तहसीलदार, माजी नगराध्यक्ष आशिष बारेवार उपस्थित होते.

### भारत मुक्ती मोर्चाचे वामन मेश्राम यांच्यावर गुन्हा

नागपूर–इमामवाड्यात आयोजित सभेत धार्मिक भावना दुखावणारे तसेच सामाजिक तेढ निर्माण करणारे प्रक्षोभक भाषण केल्याप्रकरणी भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. उंटखाना येथे आयोजित कार्यक्रमादरम्यान वामन मेश्राम यांनी भाषणादरम्यान वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्यांच्यासह बुद्धीस्ट इंटरनॅशनल नेटवर्कचे प्रभारी विलास खरात आणि संयोजक–कार्याध्यक्ष बिसेन रंगारी यांच्याविरोधातही इमामवाडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.उंटखान्यातील दहीपुरा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानावर ५ ऑक्टोबरला अधिवेशन आयोजित केले होते. या अधिवेशनाची परवानगी देण्यापूर्वी पोलीस विभागाने काही अटी ठेवल्या होत्या. त्या अटीची पूर्तता केल्यानंतरच या अधिवेशनाला पोलिसांनी परवानगी दिली होती. त्यामध्ये कोणत्याही जाती–धर्माविरुद्ध प्रक्षोभक किंवा धार्मिक भावना दुखावतील असे वक्तव्य करणार नाही, या अटीचा समावेश होता. मात्र, भारत मुक्ती मोर्चाचे अध्यक्ष वामन मेश्राम यांनी जातीय तेढ निर्माण होणारे प्रक्षोभक वक्तव्य केले. या वक्तव्याची पोलिसांनी गांभीर्याने नोंद घेऊन इमामवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. यापूर्वी ६ ऑक्टोबरला वामन मेश्राम यांनी इंदोरा चौकात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना जमा होण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनानंतर देशभरातून जवळपास ८ ते १० हजार पदाधिकारी–कार्यकर्ते इंदोरा चौकात गोळा झाले होते. त्यांनी संघ मुख्यालयावर मोर्चा काढून घेराव करण्याचा इशारा दिला होता. त्यामुळे शहरातील वातावरण तापले होते.पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी त्यांना इंदोरा चौकात सभा घेण्याची परवानगी नाकारली होती. त्यामुळे त्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयानेही सभा घेण्यास परवानगी देण्यात येऊ नये, असे आदेश दिले होते. न्यायालयाच्या आदेशानंतरही वामन मेश्राम यांनी सभा घेऊन संघ मुख्यालयाला घेराव करण्याचा निर्धार केला होता.

## श्रमाला पर्याय नाही–अप्पर पोलिस अधीक्षक बनकर




**देवरी–** अगदी पुरातन काळाचा विचार केला तर एकलव्य असो की दानवीर कर्ण, यापैकी एकाला ही मार्गदर्शक वा गुरू मिळाला नाही. ही बाब दोघांसाठी बलस्थान ठरली. आपल्यातील जिद्द आणि कठोर परिश्रमाच्या बळावर त्यांनी आपल्या क्षेत्रात उतुंग यश मिळविले. त्यांच्या तेजापुढे भलेभले योद्धे नतमस्तक झाले. म्हणून यापुढे परिस्थितीला दोष न देता अपार कष्ट करा आणि स्वतःचे अस्तित्व सिद्ध करायची जिद्द बाळगा, कारण श्रमाला दुसरा पर्याय असूच शकत नाही, असे प्रतिपादन देवरीचे अप्पर पोलिस अधीक्षक अशोक बनकर यांनी देवरी येथे(दि.११) रोजी केले.

ते स्थानिक एकात्मिक आदिवासी प्रकल्प विभागाच्या सभागृहात आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय आणि गोंदिया पोलिस दलाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पूर्व पोलिस भरती प्रशिक्षण शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी मंचावर देवरीचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. ललित कुकडे, देवरीच्या ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. आनंद गजभिये आणि देवरीचे ठाणेदार रेवचंद सिंगनजुडे उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री बनकर म्हणाले की, दान म्हणजे केवळ पैसाच नव्हे तर आपल्या जवळ समाजाचे भले होईल असे देण्यासारखे जे काही आहे, ते समाजाला सहज उपलब्ध करून देण्याची कृती सुद्धा एकप्रकारे दानच आहे. म्हणून प्रत्येकाने त्याला जे शक्य आहे, ते इतरांना देण्याच्या प्रवृत्तीची वाढ करणे गरजेचे आहे.

प्रास्ताविकामध्ये ठाणेदार रेवचंद सिंगणजुडे यांनी या शिबिराची मिमांशा विशद करताना सांगितले की, यावेळी पोलिस विभागाने शिबिरार्थीची निवड करताना दूरक्षेत्रातील अगदी नवख्या उमेदवारांची निवड केली. या लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी अत्यंत नव्या दमाचे प्रशिक्षक उपलब्ध करून दिले. प्रशिक्षणाचे शेड्यूल अगदी काटेकार आणि वेळेचे अपव्यय टाळणारे असेल असे भक्कम नियोजन केले.

एक महिना चाललेल्या या शिबिरात अत्यंत दुर्गम भागातून ६५ मुलामुलींची निवड करण्यात आली. यावेळी प्रशिक्षणार्थी उमेदवारांनी सुद्धा आपले दिलखुसाल मनोगत व्यक्त करताना पोलिस विभाग आणि आदिवासी प्रकल्प कार्यालयाचे आभार मानले. उपस्थित सर्व प्रशिक्षणार्थींनी आपण पोलिस प्रशिक्षण केंद्रात नक्की दिसणार, असा आत्मविश्वास यावेळी व्यक्त केला.

या कार्यक्रमाचे संचलन गोदिया मुख्यालयातील महिला हवालदार मंगला प्रधान यांनी केले. उपस्थितांचे आभार देवरी पोलिस उपमुख्यालयातील नक्षलसेलचे पोलिस उपनिरीक्षर बाहकर यांनी मानले.

# मार्केटिंग फेडरेशनच्या ६ केंद्रांवरून ४५ हजार क्विंटल धान गायब!

**गोंदिया :** जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या सहा शासकीय धान खरेदी केंद्रांवरील तब्बल ४५ हजार क्विंटल धान गायब असल्याचा बाब नुकतीच उघडकीस आली. जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या जिल्ह्यातील सहा धान खरेदी केंद्रावरील जवळपास ४५ हजार क्विंटल धान गायब असल्याची बाब पुढे आल्याने खळबळ उडाली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात धान नेमके गायब कसे झाले, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



जिल्ह्यात खरीप आणि रब्बी हंगामात जिल्हा मार्केटिंग फेडरेशन शासकीय धान खरेदी केंद्राच्या माध्यमातून हमीभावाने धान खरेदी करते. यानंतर खरेदी केलेल्या धानाची भरडाई करण्यासाठी राईस मिलर्ससह करार करुन तांदूळ शासनाकडे जमा केला जातो. यंदा रब्बी हंगामातील धान खरेदी दरम्यान धान खरेदी केंद्रावरील अनागोंदी कारभार उघडकीस आला. त्यातच आता सहकारी संस्थांच्या माध्यमातून धान खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आलेला तब्बल ४५ हजार क्विंटल धान संबंधित केंद्राच्या गोदामातच नसल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. जिल्हा मार्केटिंग फेडरेशन खरेदी केंद्रावरील धानाची भरडाई करण्यासाठी उचल करण्यासाठी राईस मिलर्सला डिओ दिले. ते डिओ घेऊन राईस मिलर्स जेव्हा धान खरेदी केंद्रावर पोहोचले तेव्हा धान खरेदी केंद्रावर धानच नव्हता. त्यामुळे राईस मिलर्सने याची तक्रार जिल्हा मार्केटिंग फेडरेशनकडे केली.

त्यामुळे या केंद्राना मार्केटिंग फेडरेशनने नोटीस बजावली असून त्यावर त्वरित उत्तर मागविले आहे. शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दर मिळू नये, यासाठी जिल्हा मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळांतर्गत हमीभावाने सहकारी संस्थांच्या शासकीय धान खरेदी केंद्राच्या माध्यमातून धान खरेदी केली जाते. ते या खरेदी केंद्रावर खरेदी केलेल्या धानाची राईस मिलर्ससहर्स करार करून भरडाई केली जाते. ते त्यानंतर भरडाई करुन हा तांदूळ शासनाकडे जमा केला जातो. जिल्हा मार्केटिंग फेडरेशन धानाची भरडाई करण्यासाठी राईस मिलर्ससह करार करते. त्यानंतर त्यांना खरेदी केंद्रावरील धानाची उचल करण्यासाठी डीओ देते; ते पण मागील तीन चार वर्षांपासून शासन आणि राईस मिलर्स यांच्यात संघर्ष सुरू आहे. राईस मिलर्सला भरडाईचा दर वाढवून देण्यात आला नाही. तर वाहतूक भाड्याचे कोट्यवधी रुपये शासनाकडे थकले होते. परिणामी धान खरेदी केंद्रावरून धानाची वेळेत उचल झाली नाही. तीन–चार वर्षांपासून हीच समस्या कायम आहे. त्यामुळे काही धान खरेदी केंद्रांनी याचा फायदा उचलला. खरेदी केलेल्या धानाची परस्पर विल्हेवाट लावली. तर काही खरेदी केंद्रांनी केवळ कागदावरच धान खरेदी केली असल्याची बाब राईस मिलर्स धानाची उचल करण्यासाठी गेल्यानंतर स्पष्ट झाली.

खरिपात खरेदी केलेला धान रब्बीत आणि रब्बीत खरेदी केलेल्या धानाची खरिपात उचल केली जात आहे. त्यामुळे नेमका कोणत्या हंगामातील धान किती धान खरेदी केंद्राकडे शिल्लक आहे, हे समजण्यास मार्ग नाही. एकंदरीत खरेदीच्या रोटेशनमुळे धान केंद्रावर दिसत होते; ते पण यंदा हे रोटेशन थांबल्याने धान खरेदीतील मोठे घबाड उघडकीस आले आहे. याची कबुली खुद्द याच विभागाचे काही अधिकारी देत आहेत. त्यामुळेच नुकताच जिल्ह्यातील सहा खरेदी केंद्रांवरून ४५ हजार क्विंटल धान गायब असल्याची धक्कादायक बाब पुढे आली आहे.

### चौकशीत वाढणार केंद्राची संख्या

**शासकीय धान खरेदी केंद्रावर खरेदी केलेल्या धानाची परस्पर विल्हेवाट लावली जात असल्याची बाब आता लपून राहिलेली नाही. यामुळे शासनाला कोट्यवधी रुपयांचा भुर्दंड लावला जात आहे. याची आता चौकशी जिल्हा मार्केटिंग फेडरेशनने सुरू केली असून, खरेदीपेक्षा कमी धान आढळलेल्या केंद्रांना नोटीस देण्यास प्रारंभ केला आहे. त्यामुळे घोळ असणाऱ्या केंद्रांची संख्या वाढणार आहे.**